# महाराष्ट्र विधानसभा

## चौथे अधिवेशन, २०२०

---

## अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी

**प्रश्नांची एकूण संख्या - ५०**

---

### पुणे येथील खडकवासला उपकालव्याच्या बंदिस्त लाईनमधून पाण्याची गळती होत असल्याबाबत

**(१) १६८ (११-०४-२०२०). श्री.भिमराव तापकीर (खडकवासला), श्री.राहूल कुल (दौंड) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे येथील खडकवासला उपकालव्याच्या बंदिस्त लाईनमधून लाखो लिटर पाण्याची गळती होत असल्याचे माहे डिसेंबर, २०१९ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, जलसंपदा विभागातील कार्यकारी अधिकारी, खडकवासला धरण शाखा अभियंता, उप अभियंता यांच्या सह सीडब्ल्यूपीआरएसच्या अधिकाऱ्यांशी दिनांक १७ डिसेंबर, २०१९ रोजी वा त्यासुमारास स्थानिक पत्रकार, लोकप्रतिनिधी मार्फत संपर्क केला असून अद्यापही कुठल्याही प्रकारची दुरुस्ती झालेली नाही, हे ही खरे आहे काय ,

(३) असल्यास, लाखो लिटर पाणीगळतीकडे जलसंपदा विभाग आणि सीडब्ल्यूपीआरएस प्रशासनाचे दुर्लक्ष होत असल्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. जयंत पाटील (११-१२-२०२०) :** (१) हे खरे नाही.

तथापि, नवीन मुठा उजवा कालव्याचे साखळी क्र.०/५१५ मी. या ठिकाणी सी.डब्लू.पी.आर.एस. ही केंद्र शासनाची संस्था पाईप लाईन द्वारे कालव्यातून पाणी घेते. त्यांचे पाईप लाईन वरील कालव्याच्या बाहेरील बाजूस असलेला वॉल्व्ह (Valve) नादुरुस्त झाल्यामुळे त्या ठिकाणी गळती होत होती. ती गळती सदर संस्थेने दुरुस्त करून बंद केलेली आहे.

(२) सदरील गळतीची पाहणी दि.१९.१२.२०१९ रोजी जलसंपदा विभाग व सी.डब्लू.पी.आर.एस. येथील अधिकारी यांनी केलेली आहे. सी.डब्लू.पी.आर.एस. कडून त्यांच्या पाईपलाईनचे वॉल्व्ह ची दुरुस्ती करून पाईप लाईन मधून होणारी गळती बंद केलेली आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**हिंगोली जिल्ह्यातील ग्रामसेवकाच्या भविष्य निर्वाह निधी व अंशदान सेवानिवृत्ती वेतनात झालेला गैरव्यवहार**

**(२) १०८४ (१३-०४-२०२०). श्री.तान्हाजी मुटकुळे (हिंगोली) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) हिंगोली जिल्ह्यातील ग्रामसेवकाच्या भविष्य निर्वाह निधी व अंशदान सेवानिवृत्ती वेतन योजनेमध्ये रक्कमांचा ताळमेळ लागत नसल्याची बाब माहे नोव्हेंबर, २०१९ च्या शेवटच्या आठवड्यात निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय

(२) असल्यास, सन २००५ पूर्व नंतर सेवेत कार्यरत असलेल्या शेकडो ग्रामसेवकाचे वेतनातून कपात करण्यात आलेली रक्कम मागील काही वर्षापासून जमा होत नसणे तसेच भविष्य निर्वाह निधीच्या कपातीचा हिशोब देत नसणे असे आरोप ग्रामसेवक संघटनेने केले आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या अनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. हसन मुश्रीफ (११-१२-२०२०) :** (१) हे खरे नाही.

(२), (३) व (४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**सिंधुदुर्ग जिल्हा परिषद मधील विविध विभागांचा निधी कमी खर्च झाल्याबाबत**

**(३) ३६१३ (१६-०४-२०२०). श्री.चंद्रकांत (दादा) पाटील (कोथरुड) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सिंधुदुर्ग जिल्हा परिषद मधील विविध विभागांचा माहे नोव्हेंबर, २०१९ मध्ये केवळ १७ टक्के निधी खर्च झाल्याची बाब माहे जानेवारी, २०२० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२)असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे ,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. हसन मुश्रीफ (११-१२-२०२०) :** (१) होय. ही बाब खरी आहे.

नोव्हेंबर, २०१९ अखेर १७ % निधी खर्च झालेला असून माहे मार्च २०२० अखेर ६९ % निधी खर्च झालेला आहे.

(२) जिल्हा परिषद स्व:उत्पन्नाचे अंदाजपत्रकापैकी कृषि, समाजकल्याण व महिला बालकल्याण विभाग या विभागांकडील योजनांचा वस्तुस्वरूपात मिळणारे लाभांचे हस्तांतर, रोख स्वरूपात थेट लाभार्थ्यांच्या बँक खात्यात जमा करणे (DBT) स्वरूपाच्या असल्याने, लाभार्थी निवड व त्याबाबत विविध समित्यांची मान्यता घेणे या बाबीसाठी पुरेशी प्रक्रिया केलेली असून आवश्यकतेनुसार खर्च झालेला आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**हिंगोली जिल्हयातील शिक्षकांच्या भविष्य निर्वाह निधी कपातीच्या लाखो रुपयांच्या रक्कमेचा हिशोब मिळत नसल्याबाबत**

**(४) ४६३३ (१६-०४-२०२०). श्री.तान्हाजी मुटकुळे (हिंगोली) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) हिंगोली जिल्हयातील साडेचार हजार शिक्षकांच्या भविष्य निर्वाह निधीच्या कपातीच्या लाखो रुपयांचा हिशोब मिळत नसल्याने शिक्षकामधून तीव्र संताप व्यक्त केला जात आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, जिल्हा परिषदेच्या लेखा विभागाकडून मागील दोन वर्षापासून शिक्षकांना भविष्यह निर्वाह निधीच्या खात्या जमा झालेल्या रक्कमेचा हिशोब तसेच प्रत्येक शिक्षकास पावत्या देण्याची मागणी शिक्षकांकडून केली जात आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. हसन मुश्रीफ (११-१२-२०२०) :** (१) हे खरे नाही.

(२) हे खरे नाही.

(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**सोलापूर जिल्हा परिषदेतील बांधकाम खात्यातील कर्मचाऱ्यांनी बनावट पदव्या धारण करून पदोन्नती मिळविल्याबाबत**

**(५) ५७२५ (१०-०४-२०२०). श्री.विजयकुमार देशमुख (सोलापूर शहर उत्तर) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सोलापूर जिल्हा परिषदेतील बांधकाम खात्यात पंचावन्न कर्मचाऱ्यांनी बोगस पदव्या धारण करून पदोन्नती मिळवत शासनाची फसवणूक केल्याचे निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत पदोन्नती देताना प्रशासनाने कर्मचाऱ्यांच्या कागदपत्रांची मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास,बोगस पदव्यांची बाब निदर्शनास आल्यानंतर पदोन्नती देण्यात आलेल्या कर्मचाऱ्यांना पदोन्नती नाकारण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, पदोन्नती देताना कागदपत्रांची तपासणी न करता व कामात निष्काळजीपणा करणाऱ्या संबंधित अधिकाऱ्यांवर तसेच बोगस पदव्या धारण केलेल्या कर्मचाऱ्यांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. हसन मुश्रीफ (११-१२-२०२०) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) होय, हे खरे आहे.

(३) हे खरे नाही.

(४) सोलापूर जिल्हा परिषदेच्या बांधकाम विभागाने सर्व कार्यरत स्थापत्य अभियांत्रिकी सहाय्यक यांच्या चौकशीकरिता आवश्यक कागदपत्रांची मागणी केली आहे. कर्मचाऱ्यास पदोन्नती देताना पूर्ण कागदपत्रांची तपासणी करण्यात आली आहे किंवा कसे याबाबत शहानिशा करण्यात येत आहे. चौकशी प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर बोगस पदव्या धारण करणाऱ्या संबंधित दोषी कर्मचारी यांचेवर योग्य ती कार्यवाही करण्यात येईल.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**अंबरनाथ पंचायत समितीच्या बांधकाम विभागात निधीचा अपहार झाल्याबाबत**

**(६) ६०२७ (१६-०४-२०२०). डॉ.बालाजी किणीकर (अंबरनाथ) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चिकन्याचीवाडी (ता.अंबरनाथ, जि.ठाणे) येथील जिल्हा परिषदेच्या शाळेच्या दुरुस्तीसाठी सन २०१५-१६ या आर्थिक वर्षात जिल्हा परिषदेच्या शिक्षण विभागातून २ लाख ८१ हजार रुपयांच्या खर्चाला मान्यता देण्यात आली असताना त्याच वर्षी जिल्हा परिषदेच्या सार्वजनिक बांधकाम विभागाकडूनही सदर शाळेच्या दुरुस्तीसाठी २ लाख २१ हजार रुपयांचा निधी मंजूर करण्यात आला, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, पहिल्यांदा आलेल्या निधीतून दुरुस्तीचे काम करण्यात आलेले असतांनाही दुसऱ्यांदा काम केल्याचे भासवून अंबरनाथ पंचायत समितीच्या बांधकाम विभागाच्या शाखा अभियंता व स्थापत्य अभियांत्रिकी यांनी निधीचा अपहार केल्याचे माहे डिसेंबर, २०१९ मध्ये निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत चौकशी करण्यात आली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, त्यानुषंगाने संबंधित दोषी अधिकाऱ्यांवर कारवाई करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. हसन मुश्रीफ (११-१२-२०२०) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) होय, हे खरे आहे.

(३) होय, याबाबत चौकशी करण्यात येऊन संबंधित दोषी अधिकाऱ्यांकडून अपहार झालेल्या निधीची वसूली करण्याची कार्यवाही जि.प. ठाणे यांच्याकडून करण्यात येत आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मुखेड (जि.नांदेड) येथील उपविभागात मूळ पदस्थापना असलेल्या शाखा अभियंत्याच्या नियमबाहय अतिरिक्त पदभाराबाबत**

**(७) ६८४७ (१६-०४-२०२०). श्री.बालाजी कल्याणकर (नांदेड उत्तर) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नांदेड जिल्हा परिषदेच्या बांधकाम दक्षिण विभागाच्या कार्यक्षेत्रातील मुखेड येथील उपविभागात मूळ पदस्थापना असलेल्या एका शाखा अभियंत्याच्या नियमबाहय अतिरिक्त पदभारास हदगाव उपविभागाचे उपअभियंता श्री. पी.एस.मुंडे यांचे आदेश असल्याची बाब माहे जानेवारी, २०२० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले,

(३)असल्यास, चौकशीनुसार संबधितावर काय कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) अद्याप कारवाई केली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. हसन मुश्रीफ (११-१२-२०२०) :** (१) हे खरे नाही.

(२), (३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**बावधन, बिबेवाडी, वारजे, कोथरूड (जि.पुणे.) भागात नैसर्गिक नाले बंदिस्त करून बांधकामे झाली असल्याबाबत**

**(८) ११३६९ (१८-०९-२०२०). श्री.भिमराव तापकीर (खडकवासला) :** सन्माननीय **नगर विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बावधन, बिबेवाडी, वारजे, कोथरूड (जि.पुणे.) भागात नैसर्गिक नाले बंदिस्त करून बांधकामे झाली असल्याचे माहे जून, २०२० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अनेक ठिकाणी नाल्याचा नैसर्गिक प्रवाह अडवल्याचे, नाला ९० अंशात वळविल्याचे तसेच बंदिस्त केल्याचे आढळून आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शहरातील नाल्यांचे अस्तित्व, लांबी, रुंदी यांचा सर्व्हे करून त्यांची निश्चिती करण्याच्या दृष्टीने तसेच झालेल्या अतिक्रमणांवर कारवाई करण्याच्या दृष्टीने नेमलेल्या कंपनीच्या अहवालात आणि प्रत्यक्ष जागेवरील परिस्थितीत तफावत असल्याने शासनाने चौकशी करून कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (११-१२-२०२०) :** (१) व (२) (i) नैसर्गिक नाल्याचा प्रवाह अडविला अथवा बंदिस्त केलेला नसून, तत्कालीन विकास नियंत्रण नियमावलीतील तरतूदीनुसार काही ठिकाणी आखणीमध्ये बदल करण्यात आला आहे.

(३) व (४) (i) पुणे शहरातील पावसाळी पाण्याचा निचरा योग्य प्रकारे होण्याकरीता पुणे महानगरपालिकेने प्राइमुह कन्सल्टंट यांचेकडून अहवाल तयार करून घेतलेला आहे.

(ii) सदर अहवालामध्ये पाण्याचा निचरा योग्य प्रकारे होण्यासाठी जमीनीचे समतोल सर्वेक्षण करून अस्तित्वातील नदी, नाले, ओढे व घळ यांचा एकत्रित विचार करून सर्व नाल्यांची आखणी निश्चित करणत आलेली आहे.

(iii) त्याचप्रमाणे अहवालानुसार तांत्रिक दृष्टीकोनातून नाल्याची लांबी, रूंदी व उंची निश्चित करण्यात आलेली आहे.

(iv) प्रायमुह संस्थेच्या सदर अहवालानुसार प्रस्तावित नाला प्रवाहाचे नियोजन करूनच विकसन परवानगी पुणे महानगरपालिकेकडून देण्यात येत आहे.

(v) सदरच्या अहवालानुसार यापूर्वीची काही बांधकामे प्रवाहामध्ये अडथळे ठरत आहेत ही वस्तुस्थिती आहे.

(vi) तथापि, पुणे महानगरपालिकेमार्फत बांधकाम परवानगी देताना विकास आराखड्यानुसार आलेले नाले तसेच प्रायमुह कन्सल्टंट नुसार प्रस्तावित करण्यात आलेले नाले यांचे क्षेत्र वगळून परवानग्या देण्यात येतात.

(vii) तसेच खाजगी मिळकतीमधून नाला जात असेल तर तांत्रिक निकषानुसार नाल्याची आखणी लांबी, रूंदी व उंची विहित ठेवून नाला विकसन करणे विकासकावर बंधनकारक ठेवण्यात येत असे पुणे महानगरपालिकेने कळविले आहे.

---

## धुळे जिल्ह्यासह राज्यातील शासकीय विभागातील रिक्त पदे भरण्याबाबत

**(९) ११६७६ (०८-०९-२०२०). श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.संग्राम थोपटे (भोर) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) धुळे जिल्ह्यासह राज्यातील शासकिय विभागात हजारो कर्मचाऱ्यांची पदे रिक्त असून सदर पदे भरण्याबाबत दिरंगाई होत असल्याचे माहे मे, २०२० मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, बेरोजगार तरुणांची संख्या राज्यात दिवसेंदिवस वाढत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर विभागातील रिक्त पदे तात्काळ भरण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. अजित पवार (१०-१२-२०२०) :** (१), (२) व (३) वित्त विभागाच्या दि. १६.०५.२०१८ च्या शासन निर्णयान्वये व त्यानंतर वेळोवेळी निर्गमित केलेल्या शासन निर्णयान्वये शेतकऱ्यांना सुविधा पुरविण्यासाठी महत्वाच्या सेवेशी निगडीत असलेली रिक्त पदे भरण्यास परवानगी देण्यात आलेली आहे.

कोविड-१९ च्या संसर्गजन्य रोगामुळे सन २०२०-२१ या वित्तीय वर्षात होणाऱ्या अर्थव्यवस्थेवरील परिणामांबाबत वित्तीय उपाययोजना करण्याच्या अनुषंगाने वित्त विभागाच्या दि.०४ मे, २०२० च्या शासन निर्णयान्वये सार्वजनिक आरोग्य विभाग, वैद्यकीय शिक्षण व औषधद्रव्ये विभाग वगळता कोणत्याही विभागाने कोणत्याही प्रकारची नवीन पदभरती करु नये अशा सूचना देण्यात आल्या आहेत, हे खरे आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**धुळे तालुक्यातील अक्कलपाडा प्रकल्पातून आंदोलन केलेल्या शेतकऱ्यांवरील दाखल केलेल्या गुन्हयाबाबत**

**(१०) ११६७७ (१३-०९-२०२०). श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण) :** सन्माननीय **गृह मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) धुळे तालुक्यातील अक्कलपाडा प्रकल्पाच्या डाव्या कालव्याचे काम पूर्ण झाल्यानंतर अक्कलपाडा धरणाचे पाणी कालव्यातून मिळावे या मागणीसाठी शेतकऱ्यांनी जिल्हाधिकारी कार्यालयासमोर दिनांक २० सप्टेंबर, २०१६ रोजी शांततेत आंदोलन केले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या आंदोलनकर्त्या शेतकऱ्यांवर खोटे गुन्हे दाखल केले आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर गुन्हे मागे घेण्याचे आदेश मा.गृह राज्यमंत्री यांनी दिले असूनही सदर गुन्हे अद्याप मागे घेण्यात आलेले नाहीत, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, सदरहू गुन्हे मागे घेण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. अनिल देशमुख (१३-१२-२०२०) :** (१) हे खरे आहे.
(२) (३) व (४) धुळे तालुक्यातील अक्कलपाडा प्रकल्पातील काम पूर्ण झाल्यानंतर कालव्यातून पाणी मिळावे यासाठी शेतकऱ्यांनी केलेल्या आंदोलनातील गुन्हा रजिस्टर क्रमांक २१३/२०१६ हा गुन्हा धुळे शहर पोलीस ठाणे येथे नोंदविण्यात आलेला आहे, सदर गुन्हा मागे घेण्यास अपात्र असल्याचे मंत्रिमंडळ उपसमितीने दि.२६/०७/२०१७ रोजी झालेल्या बैठकीत निर्णय घेतला आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**हवेली (जि. पुणे) तालुक्यातील पुणे-सोलापूर महामार्गावरील उरुळी कांचन येथे वाहतुक कोंडी नियंत्रणासाठी उड्डाण पूल उभारणेबाबत**

**(११) १२०९६ (१९-०९-२०२०). श्री.अशोक पवार (शिरुर), श्री.दिलीप मोहिते-पाटील (खेड आळंदी), श्री.सुनिल टिंगरे (वडगाव शेरी), श्री.चेतन तुपे (हडपसर) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) हवेली (जि.पुणे) तालुक्यातील पुणे-सोलापूर महामार्गावरील उरुळी कांचन येथे महामार्गावर मोठ्या प्रमाणात वाहतुक कोंडी होत आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उरुळी कांचन येथील तळवडी चौकातून एक मार्ग दौंडकडे, दुसरा मार्ग सासवड-जेजूरीकडे व तिसरा मार्ग उरुळी कांचन गावात जाणारा आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, या चौकात प्रवासी वाहतुक, खाजगी वाहनांची गर्दी मोठ्या प्रमाणात असते तसेच पंचक्रोशीतील शालेय विद्यार्थ्यांनाही जीव धोक्यात घालून चौकातुनच मार्गक्रमण करावे लागते, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, सदरहु ठिकाणी मोठ्या प्रमाणात होणारी वाहतुक कोंडीची समस्या सोडविण्यासाठी उरुळी कांचन येथिल महामार्गावरील एलाईट चौक ते इरिगेशन कॉलनी पर्यंत उड्डाणपूल होणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. अशोकराव चव्हाण (११-१२-२०२०) :** (१), (२) व (३) हे खरे आहे.
(४) पुणे सोलापूर ते विजयवाडा या राष्ट्रीय महामार्गावरील कि.मी.२८/९०० या ठिकाणी उरुळी कांचन चा भाग येतो. या राष्ट्रीय महामार्गाच्या दर्जोन्नतीची जबाबादारी केंद्र शासनाने 'भारतमाला' परियोजनेअंतर्गत भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरण यांचेकडे सोपविली असून केंद्र शासनाच्या दि.२४.०४.२०२० च्या अधिसुचनेनुसार सदर लांबी प्रकल्प संचालक, भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरण, पुणे यांचेकडे सोपविण्यात आली आहे.

त्यानुसार प्रस्तुत प्रकरणी प्रकल्प संचालक, भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरण,पुणे यांनी पुढील प्रमाणे माहिती कळविली आहे :-

पुणे महानगर प्रादेशिक विकास महामंडळ (PMRDA) यांच्याकडून उरुळी कांचन येथे ग्रेड सेपरेटर बांधण्याकरीता परवानगी मागण्यात आली होती. यास्तव भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरण, नवी दिल्ली मुख्यालयाकडून पुणे-विजयवाडा सहापदरीकरणासाठी (६ Laning Economic Corridor) नियुक्त केलेल्या प्रकल्प सल्लागारास सदर प्रकरणी आवश्यक तरतुदीबाबत विचारणा करण्यातआली असून सदयस्थितीत सदर प्रस्तावाची छाननी सुरु आहे. त्यानंतर याबाबत पुणे महानगर प्रादेशिक विकास महामंडळ (PMRDA) यांना अवगत केले जाईल.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

### उरुळी कांचन व वाघोली (ता.हवेली, जि.पुणे) येथे स्वतंत्र पोलीस ठाणे उभारणेबाबत

**(१२) १२११९ (१७-०७-२०२०). श्री.अशोक पवार (शिरुर), श्री.दिलीप मोहिते-पाटील (खेड आळंदी), श्री.सुनिल टिंगरे (वडगाव शेरी), श्री.चेतन तुपे (हडपसर) :** सन्माननीय **गृह मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) उरुळी कांचन व वाघोली (ता.हवेली, जि.पुणे) ही गावे मोठया लोकसंख्येची असून या गावांत उद्योग व्यवसाय, नोकरी या निमित्ताने नागरीकांचा ओघ मोठया प्रमाणावर असल्याने दिवसेंदिवस येथील लोकसंख्येत भर पडत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उरुळी कांचन येथे स्वतंत्र पोलीस स्टेशन निर्मितीबाबतचा प्रस्ताव शासनाकडे प्रलंबित आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, या गावांजवळची वाढती लोकसंख्या लक्षात घेता कायदा व सुव्यवस्था ठेवण्यासाठी उरुळी कांचन व वाघोली येथे स्वतंत्र पोलीस ठाणे उभारण्यास मान्यता देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. अनिल देशमुख (१३-१२-२०२०) :** (१), (२) व (३) पोलीस अधीक्षक, पोलीस ग्रामीण यांनी लोणी काळभोर पोलीस स्टेशन अंतर्गत उरळी कांचन पोलीस दूरक्षेत्राचे रूपांतर नवीन पोलीस स्टेशनमध्ये होणेबाबतचा प्रस्ताव तसेच लोणीकंद पोलीस स्टेशन कार्यक्षेत्र अंतर्गत वाघोली येथे नवीन पोलीस ठाणे निर्माण करणेबाबतचा प्रस्ताव पोलीस महासंचालक कार्यालयास सादर केला असून सदर प्रस्तावाच्या अनुषंगाने उपस्थित केलेल्या मुद्याची माहिती समाविष्ट करून परिपूर्ण प्रस्ताव सादर करण्याबाबत पोलीस महासंचालक कार्यालयाने पोलीस अधीक्षक, पुणे ग्रामीण यांचे कार्यालयास कळविले आहे.

शासनाकडे प्रस्ताव प्राप्त झाल्यानंतर नियमानुसार छाननी करून पुढील कार्यवाही करण्यात येईल.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**ठाणे व पालघर जिल्हयातील मच्छिमारांना डिझेल परताव्याची थकीत रक्कम देण्याबाबत**

**(१३) १२५६६ (१२-०८-२०२०). श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी), श्री.श्रीनिवास वनगा (पालघर) :** सन्माननीय **मत्स्यविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) ठाणे व पालघर जिल्हयातील मच्छिमारांना शासनाकडून देय असलेली कोटयावधी रुपयांची डिझेल परताव्याची रक्कम अद्याप दिली नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, रायगड जिल्हयाला ८ कोटी १५ लाख, रत्नागिरीला ६ कोटी ९५ लाख ,मुंबई शहराला ६ कोटी ६६ लाख, तर मुंबई उपनगरातील संस्थाना ६ कोटी ६८ लाख रुपयांचा डीझेल परतावा देण्यात आलेला असताना ठाणे, पालघर व सातपाटी येथील मच्छिमारांना अद्याप डिझेल परताव्याची रक्कम न देण्याची कारणे काय आहेत,
(३) असल्यास, पालघर जिल्हयातील मच्छिमारांना ७ कोटी रुपयांचा डीझेल परतावा दिला नसल्याने सदरहू डीझेल परतावा तात्काळ मिळण्याबाबतची मागणी मा.कृषी मंत्री तथा पालकमंत्री, पालघर यांच्याकडे दिनांक २५ जून, २०२० रोजी वा त्यासुमारास स्थानिक लोकप्रतिनिधीनी लेखी निवेदनाद्वारे केली आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, ठाणे व पालघर जिल्हयातील मच्छिमारांना डिझेल परताव्याची थकीत रक्कम तातडीने देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. अस्लम शेख (११-१२-२०२०) :** (१) हे अंशत: खरे आहे.
(२) हे खरे नाही.

सन २०१९-२० व २०२०-२१ मध्ये मंजूर निधीच्या प्रमाणात जिल्हानिहाय वितरीत करण्यात आलेल्या निधीचा तपशिल खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | जिल्हा | सन २०१९-२० मध्ये वितरीत निधी (कोटी) | सन २०२०-२१ मध्ये वितरीत निधी (कोटी) |
|---|---|---|---|
| १) | ठाणे | ३.३० | ०.८४ |
| २) | पालघर | ४.३० | ०.९८ |
| ३) | मुंबई शहर | २०.८९ | - |
| ४) | मुंबई उपनगर | २१.७० | - |
| ५) | रायगड | १८.२५ | ६.४९ |
| ६) | रत्नागिरी | १६.३५ | ६.१२ |
| ७) | सिंधुदुर्ग | ५.८६ | ४.९२ |
| | एकूण | ९०.६५ | १९.३५ |

(३) होय हे खरे आहे.
(४) डिझेल तेलावरील प्रतिपूर्ती या योजने अंतर्गत प्रलंबित प्रस्तावांचा निपटारा होण्यासाठी प्रत्येक अधिवेशनामध्ये पूरक मागणीद्वारे निधीची मागणी करण्यात येते.

सन २०१९-२० अर्थसंकल्पीत रु.६०.०० कोटी वगळता रु. ३०.६५ कोटी इतका निधी पुरवणी मागणीद्वारे मंजूर झोला आहे.

सन २०२०-२१ मध्ये ६० कोटी इतका निधी अर्थसंकल्पित असून, कोविड विषाणू प्रादूर्भावामुळे वित्त विभागाने दिनांक १६.०४.२०२० रोजीच्या परिपत्रकान्वये ३३ टक्के निधी खर्च करण्यास मान्यता दिलेली आहे तथापी त्यास अपवाद करुन रु. १९.३५ कोटी वितरीत केलेला आहेत.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**अक्कलकोट तालुक्यातील (जि.सोलापूर) रस्ते नादुरुस्त झाल्याने अपघाताचे प्रमाण वाढल्याबाबत**

**(१४) १२८४० (०६-०८-२०२०). श्री.सुभाष देशमुख (सोलापूर दक्षिण) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय:-
(१) अक्कलकोट तालुक्यातील (जि.सोलापूर) सार्वजनिक विभागाच्या अखत्यारितीतील सर्वच रस्त्यांची अवस्था अत्यंत खराब झाली असुन त्यामुळे अपघाताचेही प्रमाण वाढल्याचे माहे मे, २०२० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, तडवळ ते सुलेरजवळगे-सोलापूर हा रस्ता निधी अभावी रखडलेला असून अक्कलकोट ते सिंदखेड हा रस्ता गतवर्षी मंजूर केला असून सुरु असलेले काम निकृष्ट दर्जाचे होत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणांची शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय निष्पन्न झाले व तद्नुसार अक्कलकोट तालुक्यातील रस्त्यांचे दुरुस्तीचे काम तात्काळ पूर्ण करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. अशोकराव चव्हाण (११-१२-२०२०) :** (१) हे खरे नाही.

अक्कलकोट तालुक्यातील सार्वजनिक बांधकाम विभागाच्या हद्दीतील सर्व रस्ते सुस्थितीत आहेत. पोलीस निरिक्षक, उत्तर पोलीस ठाणे, अक्कलकोट यांचे माहे मे, २०२० मधील अहवालानुसार अक्कलकोट ते शिरवळ रस्त्यावर अपघात झालेला असुन हा वाहन चालकाच्या हयगयीने, अविचाराने व निष्काळजीपणे वाहन वेगाने चालवल्यामुळे झालेला दिसून येत असल्याचे अहवालामध्ये नमुद केलेले आहे. तसेच पोलिस निरिक्षक, दक्षिण पोलिस ठाणे, अक्कलकोट यांचे अहवालानुसार त्यांचे हद्दीत माहे मे, २०२० मध्ये अपघात झालेला नाही.

उपरोक्त पोलीस अहवालानुसार अक्कलकोट तालुक्यात माहे मे, २०२० मध्ये रस्त्याच्या खराब अवस्थेमुळे अपघात घडलेला नाही.

(२) प्रश्नांकीत

(अ) तडवळ ते सुलेरजवळगे- सोलापूर या लांबीमधील तडवळ ते सुलेरजवळगे हा इजिमा ८४ असा असून हि लांबी ग्रामविकास विभागाच्या अखत्यारित आहे. सदर लांबीत वाळु वाहतूकीमुळे रस्ता खराब झाला असून ग्रामविकास विभागाच्या अहवालानुसार सदर रस्त्याच्या सुधारणा कामे प्राधान्य निकष व निधि उपलब्धतेनुसार हाती घेतले जातील.

(ब) सुलेरजवळगे येथून सोलापूरला जाणारा सुलेरजवळगे ते होटगी रेल्वेस्टेशन रस्ता हा प्रजिमा ४९ असा असून पुढे होटगी रेल्वे स्टेशन ते सोलापूर हा रामा ३९६ असा आहे. या दोन्ही रस्त्यांच्या एकुण लांबीपैकी कि.मी. १५.९० लांबीत योजने अंतर्गत सुधारणा कामे प्रगतीत असून उर्वरीत लांबी सुस्थितीत आहे.

(क) अक्कलकोट ते सिंदखेड हा ग्रा.मा. १४२ असून या लांबीतील २.०० कि.मी. लांबीमधील रस्त्याच्या सुधारणा कामाची निविदा प्रक्रिया प्रगतीत आहे. ग्रामविकास विभागाच्या अहवालानुसार उर्वरीत लांबीतील कामे प्राधान्य निकष व निधि उपलब्धतेनुसार हाती घेतले जातील.

(३) व (४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## राज्यातील कोरोना विषाणुमुळे महावितरण विद्युत कंपनीतील अधिकारी व कर्मचारी यांचा मृत्यु आल्यास विमा संरक्षण देण्याच्या निर्णयाबाबत

**(१५) १३२२३ (२५-०९-२०२०). श्री.दिपक चव्हाण (फलटण) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात कोरोना विषाणुमुळे महावितरण कंपनीतील संचालन व दुरुस्तीच्या कामासाठी नियुक्त केलेल्या कंत्राटी कर्मचा-यांना (बाहयस्त्रोत) तसेच अधिकारी व कर्मचारी व कंपनी

अधिनस्थ विविध कार्यालयातील सुरक्षा रक्षक यांना ३० लाख रुपयांचे विमा सरंक्षण देण्याचा निर्णय मा.ऊर्जा मंत्री यांनी दिनांक २० जून, २०२० रोजी वा त्यासुमारास घेतला आहे हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या कोरोना महामारीच्या काळात कार्यरत असताना अशा अधिकारी,कर्मचारी व सुरक्षारक्षकास मृत्यु आल्यास त्यांना कोरोना योध्दा समजून त्यांच्या वारसांस ३० लाख रुपये सानुग्रह अनुदान देण्याचाही निर्णय शासनाने माहे जून, २०२० मध्ये वा त्यादरम्यान घेतला आहे हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, माहे मार्च, २०२० पासून ते आजतागायत महावितरण कंपनीतील कोरोना योध्दयांच्या जिवीतहानीच्या किती घटना घडल्या आहेत,

(४) तसेच यासर्व प्रकरणी शासनाने मृतांच्या वारसांस सानुग्रह अनुदान देण्याबाबत कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे, नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. नितिन राऊत (०९-१२-२०२०) :** (१) व (२) राज्य शासनाचा दि. २९.०५.२०२० चा शासन निर्णय विचारात घेऊन महावितरण कंपनीमध्ये सर्व तांत्रिक तसेच अतांत्रिक संवर्गामध्ये कार्यरत सर्व अधिकारी / कर्मचारी (तसेच सर्व प्रशिक्षणार्थी / सहाय्यक कर्मचारी) व महावितरण कंपनीत बाह्यस्त्रोताद्वारे कंत्राटदार संस्थेमार्फत कार्यरत कंत्राटी कामगार आणि सुरक्षा रक्षक यांचा कर्तव्य बजावित असताना कोव्हीड-१९ या विषाणूच्या प्रादुर्भावामुळे मृत्यू झाल्यास त्यांच्या कुटुंबियांना/ वारसांना रू ३० लक्ष इतक्या रकमेचे सानुग्रह सहाय्य अदा करण्याबाबत दि. १९.०६.२०२० चे परिपत्रक महावितरण कंपनीने निर्गमित केले आहे.

(३) व (४) माहे मार्च,२०२० पासून दि. ३०.०९.२०२० पर्यंत महावितरण कंपनीमधील कोरोना योद्ध्यांच्या जिवीत हानीच्या ४९ घटना घडल्या आहेत. त्यात ४३ नियमित कर्मचारी, ०२ बाह्यस्त्रोत कामगार व ०४ सुरक्षा रक्षक यांचा समावेश आहे. कोरोनामुळे मृत्यू पावलेल्या ९ कर्मचाऱ्यांच्या वारसांना रू.३० लक्ष सानुग्रह सहाय्य अदा करण्यात आले आहे. उर्वरित वारसांना सानुग्रह अनुदान देण्याबाबतची कार्यवाही महावितरण कंपनीकडून सुरू आहे.

---

**राज्यात एलईडी दिव्याचा वापर करुन मासेमारी करणाऱ्यांवर कारवाई करणेबाबत**

**(१६) १४०५४ (१६-०९-२०२०). डॉ.भारती लव्हेकर (वर्सोवा) :** सन्माननीय **मत्स्यविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात एलईडी दिव्याचा वापर करुन मासेमारी करण्यास केंद्र शासनाच्या आदेश क्र.२००१/०३/२०१४-FY (Inland end) दिनांक १० नोव्हेंबर, २०१७ अन्वये बंदी घालण्यात आलेली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शासनाच्या आदेशानुसार एलईडी दिव्याचा वापर करुन मासेमारी करणाऱ्या नौकांवर महाराष्ट्र सागरी मासेमारी नियमन मत्स्यव्यवसाय, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे कार्यालयाकडून जा.क्र.मत्स्य/०५३१०१/२४७/२०१५, दिनांक १५ जानेवारी, २०१८ अन्वये दिलेल्या पत्रामध्ये एलईडी दिवे वापरुन मासेमारी करणाऱ्या नौकांच्या संस्थेवर प्रशासकीय कारवाई

करण्यात येईल व शासनामार्फत देण्यात येणाऱ्या सर्व सवलती बंद करण्याचे प्रस्तावित करण्यात येईल असे नमूद असतांना एलईडी दिव्यांद्वारे मासेमारी सुरु असल्याचे माहे जून, २०२० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, कोकण समुद्र किनाऱ्यालगत एलईडी दिव्यांच्या सहाय्याने होणाऱ्या मासेमारीमुळे किनारपट्टीवरील मासळीच्या उत्पादनात घट झाल्याने मच्छिमारांवर उपासमारीची वेळ आली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, एलईडी दिव्यांचा वापर करुन सुरु असलेली मासेमारी बंद करुन अवैधरित्या मासेमारी करणाऱ्यांवर कारवाई करण्याची मागणी मच्छीमाऱ्यांनी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन एलईडी दिव्यांचा वापर करुन सुरु असलेली मासेमारी बंद करण्यासह अवैधरित्या मासेमारी करणाऱ्यांवर कारवाई करणेबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. अस्लम शेख (०७-१२-२०२०) :** (१) हे, खरे आहे.

(२) हे, खरे नाही.

(३) मागील तीन वर्षाची मत्स्योत्पादनाची आकडेवारी खालीलप्रमाणे आहे.

| वर्ष | २०१६-१७ | २०१७-१८ | २०१८-१९ |
|---|---|---|---|
| उत्पादन मे.टन | ४६२७४७ | ४७४९९२ | ४६७२३२ |

उपरोक्त आकडेवारी पहाता मत्स्योत्पादनात घट झाल्याचे दिसुन येत नाही

(४) हे खरे आहे.

(५) अनधिकृत व अवैध एलईडी मासेमारी रोखण्यासाठी माहे ऑगस्ट, २०१८ ते १३ सप्टेंबर २०२० या कालावधीत विभागामार्फत केलेल्या कारवाईचा तपशिल खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | जिल्हा | एकूण नौकां संख्या |
|---|---|---|
| १ | मुंबई शहर | ११ |
| २ | रायगड | ४७ |
| ३ | रत्नागिरी | ३३ |
| ४ | सिंधुदुर्ग | १३ |
| एकूण | | १०४ |

---

## चंद्रपूर जिल्हा कृषी औद्योगिक सहकारी संघ मर्यादित, चंद्रपूर या संस्थेत झालेला गैरव्यवहार

**(१७) १४३३७ (१७-०८-२०२०). श्री.सुधीर मुनगंटीवार (बल्लारपूर) :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चंद्रपूर जिल्हा कृषी औद्योगिक सहकारी संघ मर्यादित, चंद्रपूर या संस्थेमध्ये झालेल्या गैरव्यवहाराची चौकशी करण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधी यांन मा.सहकार मंत्री यांना दिनांक २४ जून, २०२० रोजी वा त्यासुमारास लेखी निवेदन सादर केले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. शामराव ऊर्फ बाळासाहेब पाटील (१०-१२-२०२०) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) चंद्रपूर जिल्हा कृषी औद्योगिक सहकारी संघ म., चंद्रपूर या संस्थेच्या सन २००७-२००८ ते सन २०१३-१४ या कालावधीतील आर्थिक व्यव्हारासंदर्भात चाचणी लेखापरिक्षण करणेबाबत जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, चंद्रपूर यांनी दि.२८.८.२०२० रोजी आदेश निर्गमित केले आहेत. सदर चाचणी लेखापरिक्षण अहवालातील निष्कर्षानुसार पुढील कार्यवाही करण्यात येईल.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## ठाण्यातील मुंब्रादेवी डोंगरावर भूमाफियांकडून अनधिकृत झोपड्यांचे बांधकाम करण्यात आल्याबाबत

**(१८) १४३७१ (१५-०९-२०२०). श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंब्रादेवी (जि.ठाणे) येथे टाळेबंदीच्या काळात भूमाफियांमार्फत डोंगरावर अतिक्रमण करुन अनधिकृत झोपड्यांचे बांधकाम करण्यात आले असून त्या झोपड्यांची ७० ते ८० हजारामध्ये विक्री करण्यात आल्याची बाब माहे जुलै, २०२० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय व चौकशीत काय आढळून आले,
(३) असल्यास, चौकशीच्या अनुषगांने संबधित दोषींवर कोणती कारवाई करण्यात आली वा करण्यात येत आहे,
(४) तसेच, भुमाफियांमार्फत डोंगराळ भागात होत असलेल्या अतिक्रमणाला आळा घालण्याच्या दृष्टिने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. संजय राठोड (०४-१२-२०२०) :** (१) टाळेबंदीच्या काळात मुंब्रादेवी (जि.ठाणे) डोंगरावर स.क्र. १२७ मध्ये नव्याने ७ अनधिकृत झोपड्याचे बांधकाम करण्यात आल्याचे निदर्शनास आले आहे. तथापि चौकशीमध्ये सदर झोपड्यांची ७० ते ८० हजारामध्ये विक्री करण्यात आल्याची बाब निदर्शनास आलेली नाही.
(२) व (३) सदर प्रकरणी चौकशी करण्यात आली असून अनधिकृत बांधकाम आढळून आल्यानंतर अतिक्रमणधारकांविरुध्द दिनांक २४.८.२०२० रोजी गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

(४) वन हद्दीवर संरक्षक भिंतीचे बांधकाम प्रस्तावित करण्यात आले असून क्षेत्रीय कर्मचाऱ्यांमार्फत वेळोवेळी गस्त घलण्यात येते. गस्तीच्या वेळेस नव्याने अतिक्रमण झाल्याचे आढळून आल्यास ते तात्काळ निष्कासित करण्याची कार्यवाही करण्यात येते.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

### कामगार विभागातील कल्याण आयुक्त पदाचा अतिरिक्त कार्यभार वर्ग ३ च्या सहायक आयुक्तांना दिल्याबाबत

**(१९) १४५६७ (२०-०९-२०२०). श्री.विनोद निकोले (डहाणू) :** सन्माननीय **कामगार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कामगार कल्याण मंडळाच्या कल्याण आयुक्त पदाचा (वर्ग १) चा अतिरिक्त कार्यभार मंडळातील वर्ग ३ चे सहाय्यक कल्याण आयुक्त, श्री. महेंद्र तायडे यांच्याकडे बेकायदा माहे मार्च, २०१९ पासून सोपवण्यात आला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, अतिरिक्त कार्यभार स्वीकारल्यानंतर श्री.तायडे यांनी केलेला गैरव्यवहार, त्यांची मूळ नियुक्ती बोगस असणे आणि लाचलुचपत विभागाकडून अपसंपदा चौकशी प्रलंबीत असताना देखील शासनाने तायडे यांचा कल्याण आयुक्त पदाचा अतिरिक्त कार्यभार कायम ठेवण्यात येऊन कोणतीही कारवाई केली नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी चौकशी करुन शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिलीप वळसे-पाटील (०९-१२-२०२०) :** (१) हे खरे नाही.

कामगार कल्याण मंडळाच्या कल्याण आयुक्त पदाचा (वर्ग १) चा अतिरिक्त कार्यभार महाराष्ट्र कामगार कल्याण मंडळ मुख्यालयातील सेवाज्येष्ठ सहायक कल्याण आयुक्त श्री. महेंद्र तायडे यांच्याकडे दिनांक ०७.०३.२०१९ च्या शासन आदेशान्वये प्रशासकीय व्यवस्था म्हणून तात्पुरत्या स्वरुपात सोपविण्यात आला आहे.
(२) व (३) श्री. तायडे यांच्याविरुध्द प्राप्त झालेल्या तक्रारींच्या अनुषंगाने कामगार विभागातील उप सचिवांमार्फत चौकशी करण्यात आली त्यानुसार सदर तक्रारींमध्ये तथ्य नसल्याचे अहवालात आढळून आले.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

### कोरोनाच्या महामारीच्या काळात राज्यातील ४४ हजार विद्यार्थी शिष्यवृत्ती पासून वंचित असल्याबाबत

**(२०) १४५७४ (२०-०९-२०२०). श्री.मनोहर चंद्रिकापूरे (अर्जुनी-मोरगांव), श्री.राजू कारेमोरे (तुमसर), श्री.इंद्रनिल नाईक (पुसद) :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोरोना महामारीच्या परिस्थितीत राज्यातील ४४ हजार अनुसुचित जातीचे मॅट्रिकोत्तर विद्यार्थी शिष्यवृत्ती पासून वंचित असल्याची बाब माहे मार्च, २०२० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, महाडिबीटी पोर्टलवर विद्यार्थ्यांनी भरलेले अर्ज समाज कल्याण सहायक आयुक्तांनी पडताळले नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, वर्क फ्रॉम होमच्या कारणास्तव सदर विद्यार्थी शिष्यवृत्तीपासून वंचित आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी करुन वंचित विद्यार्थ्यांना तात्काळ शिष्यवृत्ती मिळणेकरीता शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. धनंजय मुंडे (२६-११-२०२०) :** (१) अशंत: खरे आहे.

(२) हे खरे नाही.

(३) हे खरे नाही.

(४) व (५) सन २०१९-२० या वर्षातील समाजकल्याण आयुक्तालय यांच्या स्तरावरील १७,५६० अर्जाकरीता अर्थसंकल्प वितरण प्रणालीवर तरतूद प्राप्त होताच, देयके कोषागार कार्यालयात सादर करुन, संबंधित पात्र विद्यार्थ्यांना देय शिष्यवृत्ती मंजूर करण्याची कार्यवाही करण्यात येईल.

---

**राज्यात विविध जिल्हयांमध्ये बनावट सॅनिटायझरचा पुरवठा होत असल्याबाबत**

**(२१) १४५८३ (१४-०९-२०२०). श्री.मनोहर चंद्रिकापूरे (अर्जुनी-मोरगांव), श्री.राजू कारेमोरे (तुमसर), श्री.इंद्रनिल नाईक (पुसद) :** सन्माननीय **अन्न व औषध प्रशासन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील मुंबई, नागपूर, नगर, नाशिक व इतर जिल्हयांमध्ये करोना संसर्गाच्या काळात टाळेबंदी असताना अनेक व्यापाऱ्यांकडून बनावट सॅनिटायझरचा पुरवठा व साठा होत असल्याचे माहे एप्रिल, २०२० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अनेक कंपन्या बनावट सॅनिटायझर तयार करत असून याकडे अन्न व औषध प्रशासन विभागाचे दुर्लक्ष होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार बनावट सॅनिटायझर तयार करणाऱ्या कंपन्या व याची विक्री करणाऱ्या केमिस्ट एण्ड ड्रगीस्ट दुकानांची मान्यता रद्द करुन त्यांच्यावर कारवाई करणेबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. राजेंद्र शिंगणे (११-१२-२०२०) :** (१) हे अंशतः खरे आहे.

(२) हे खरे नाही.

(३) सदर प्रकरणी नागपूर विभाग-,पुणे विभाग-१,औरंगाबाद विभाग-३,कोकण विभाग-१ व बृहन्मुंबई विभाग-२ अशा एकूण ०८ प्रकरणांमध्ये बनावट सॅनिटायझर ची विक्री होत असल्याचे अन्न व औषध प्रशासनाच्या निदर्शनास आले आहे. सदर प्रकरणांमध्ये संबंधित पोलिस स्टेशन मध्ये गुन्हे नोंदविण्यात आले असून पुढील चौकशी व तपास सुरु आहे.

कोकण विभागाने मे.अनाईका इंडस्ट्रीज विरार (पूर्व) या उत्पादन संस्थेस कारणे दाखवा नोटीस बजावून त्वरीत उत्पादन प्रक्रिया बंद करण्याचे आदेश दिलेले आहेत.

अन्न व औषध प्रशासनाद्वारे सॅनिटायझरचे एकूण १५३ नमुने चाचणीसाठी व विश्लेषणासाठी घेतले असून, त्यापैकी १२ नमुने बनावट घोषित झालेले आहेत. सदर सर्व प्रकरणात तपास काम पूर्ण करण्यात येवून संबधितांविरुध्द कायदेशीर कारवाई घेण्यात येत आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## सामाजिक न्याय विभागाअंतर्गत अनुदानित वसतिगृहाच्या कर्मचाऱ्यांना वेतनश्रेणी लागू करणेबाबत

**(२२) १४६९९ (२०-०९-२०२०). श्री.मंगेश चव्हाण (चाळीसगाव) :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सामाजिक न्याय विभागाअंतर्गत राज्यात एकूण २३८८ अनुदानित वसतीगृहे चालविली जातात त्या वसतीगृहात राज्यातील जवळपास ९९ हजार मागासवर्गीय विद्यार्थी शिक्षण घेत आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, इ.स.१९५१ पासून अधीक्षक हे एकच पद होते, त्यानंतर स्वयंपाकीन, मदतनीस व चौकीदार ही पदे सन २००४ सालापासून निर्मिती झाली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, इ.स. १९५१ पासून जरी अनुदानित वसतिगृहे ही सुरू झाली तेव्हापासून अधीक्षक पद हे अत्यल्प मानधनावरच २४ तास काम करीत असून १००% अनुदानावर असणाऱ्या वसतीगृहातील अधीक्षकांना अद्यापही वेतनश्रेणी लागू करण्यात आलेली नाही हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, अनुदानावर असणाऱ्या वसतीगृहातील अधीक्षकांना वेतनश्रेणी लागू करण्यासंदर्भात शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. धनंजय मुंडे (२४-११-२०२०) :** (१), (२) व (३) होय.

(४) शासन निर्णय दि. ८ जुलै,२०१९ अन्वये अनुदानित वसतिगृहातील अधिक्षकांना १५ टक्के मानधन वाढ देण्यात आलेली आहे. वेतनश्रेणी लागू करण्यात आलेली नाही.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

### नांदेड जिल्ह्यातील जात पडताळणी समितीची प्रकरणे प्रलंबित असल्याबाबत

**(२३) १४७०९ (२०-०९-२०२०). श्री.संभाजी पाटील-निलंगेकर (निलंगा) :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जिल्हा जात पडताळणी समिती नांदेड येथील सेवा/विद्यार्थी यांच्या प्रकरणाचा निपटारा धिम्या गतीने होत असल्याने अनेक प्रकरणे प्रलंबित असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी दिनांक १ ऑक्टोबर, २०१९ ते २९ मार्च, २०२० या कालावधीतील सेवा/विद्यार्थी यांची किती प्रकरणे प्रलंबित आहेत,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी प्रलंबित असण्याची कारणे काय आहेत तसेच सदर प्रकरणातील किती प्रकरणातील त्रुटीची पुर्तता करुन प्रकरणे निकाली काढली आहेत,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने प्रलंबित प्रकरणे निकाली काढून प्रकरणे प्रलंबित ठेवणाऱ्या अधिकाऱ्यांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. धनंजय मुंडे (२७-११-२०२०) :** (१) व (२) अंशत: खरे आहे.

दिनांक १ ऑक्टोबर २०१९ ते दिनांक २९ मार्च, २०२० या कालावधीत सेवा/विद्यार्थी यांची एकूण ७४२७ प्रकरणांपैकी एकूण ६३७६ प्रकरणे मार्च, २०२० पर्यंत निकाली काढण्यात आलेली आहेत. मार्च, २०२० अखेर ११५१ प्रकरणे प्रलंबित आहेत. माहे सप्टेंबर, २०२० मध्ये प्रलंबित ११५१ प्रकरणांपैकी २७३ प्रकरणे निकाली काढलेली आहेत. उर्वरित ८७८ प्रकरणांपैकी जात नोंद पुरावे असलेले १४३ प्रकरणे व १२४ प्रकरणांत अर्जदारांनी त्रुटी पूर्तता केल्याने अशी २६७ प्रकरणे समिती समोर निर्णयासाठी आहेत.

(३) सदर प्रलंबित प्रकरणांमध्ये अर्जदारांनी आवश्यक कागदपत्रांची पुर्तता केलेली नाही. तसेच काही प्रकरणांत समितीने संबंधित व्यक्तीचे वैधता प्रमाणपत्र आहे अशा बाबतीत जाहीर प्रसिध्दी देवून आक्षेप मागविण्याची कार्यवाही समिती स्तरावर सुरू आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

### आडाळी (ता.दोडामार्ग, जि.सिंधुदुर्ग) येथे आर्युवेदिक संशोधन केंद्र कार्यान्वित करणेबाबत

**(२४) १५४७१ (२१-११-२०२०). श्री.कालीदास कोळंबकर (वडाळा) :** सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) आडाळी (ता.दोडामार्ग, जि.सिंधुदुर्ग) येथे केंद्र शासाने आयुर्वेदिक संशोधन केंद्र प्रकल्पास मंजुरी दिली असून १०० कोटींच्या या प्रकल्पामुळे जिल्ह्यात रोजगार निर्मितीला चालना मिळणार असून जिल्ह्यातील ७५० गावांमध्ये चारशे अधिक असलेल्या वैद्यांच्या ज्ञानाचा कोकणवासियना आरोग्याच्या दृष्टीने फायदा होणार आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, केंद्रीय आयुष मंत्रालयाने आडाळी आयुर्वेदिक केंद्र प्रकल्प मंजूर केल्यानंतर राज्य सरकारने आडाळी एमआयडीसी येथील आवश्यक ती जमीन देण्याचे निश्चितही केले असताना सद्यस्थितीत हा प्रकल्प लातूरला स्थलांतरित करण्याबाबत मंत्रालयीन स्तरावर प्रक्रिया सुरु करण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, आडाळी येथील राष्ट्रीय वनौषधी संशोधन प्रकल्प अन्यत्र हलविल्यास सदर प्रकल्प अन्य राज्यांसाठी मंजूर करण्यात येईल असे स्पष्टपणे केंद्रीय आयुष मंत्रालयाने राज्य शासनाला कळवले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, आडाळी एमआयडीसीतील ७०० एकर जागा यासाठी संबंधित असून त्यासाठी शंभर एकर जागा प्रकल्प साकारण्यासाठी आवश्यकता असुन सिंधुदुर्ग जिल्ह्यात मोठ्या प्रमाणात औषधी वनस्पती उपलब्ध असताना सदर प्रकल्प लातूर येथे स्थलांतरित करण्याची प्रक्रिया सुरु करण्याची कारणे काय आहेत,

(५) असल्यास, आडाळी वनौषधी संशोधन प्रकल्प अन्यत्र स्थलांतरित करण्यास कोकणातील लोकप्रतीनिधीनी स्पष्टपणे विरोध दर्शविला असून त्याबाबतचे सविस्तर निवेदन मा.मुख्यमंत्री यांना सादर केले आहे, हे ही खरे आहे काय,

(६) असल्यास, केंद्रीय आयुष मंत्रालयाने मंजूर केलेला आडाळी येथील राष्ट्रीय वनौषधी संशोधन प्रकल्प आडाळी येथेच विनाविलंब कार्यान्वित करण्याची प्रक्रिया राबविण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे ?

**श्री. अमित विलासराव देशमुख (१२-१२-२०२०) :** (१) हे खरे नाही.

(२) हे खरे नाही.

(३) हे खरे नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

(५) अंशत: खरे आहे.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

---

## दिवा (जि.ठाणे) विभागाचा क्लस्टर योजनेत समावेश करणेबाबत

**(२५) १५६२४ (२०-११-२०२०). श्री.प्रमोद (राजू) रतन पाटील (कल्याण ग्रामीण) :** सन्माननीय **नगर विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ठाणे येथील क्लस्टर योजना राबविताना दिवा (जि.ठाणे) विभागाचा प्राधान्याने समावेश करण्यात यावा अशा आशयाचे एक सविस्तर पत्र कल्याण (ग्रामीण) मतदार संघाचे लोकप्रतिनिधी यांनी मा.मुख्यमंत्री यांना दिनांक ५ फेब्रुवारी, २०२० रोजी वा त्यासुमारास सादर केले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीनुसार दिवा (जि.ठाणे) विभागाचा क्लस्टर योजनेत समावेश करणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (०८-१२-२०२०) :** (१) होय.

(२) शासनाने दिनांक ५ जुलै, २०१७ रोजीच्या अधिसूचनेन्वये नागरी पुनर्निर्माण समुह विकास योजनेबाबतची नियमावली मंजूर करण्यात आली आहे.सदर नियमावलीनुसार ठाणे महानगरपालिका क्षेत्रात क्लस्टर योजना राबविणेकरीता उक्त नियमावलीच्या तरतूदीनुसार नागरी पुनर्निर्माण आराखडा (Urban Renewal Plan) तयार करण्याची कार्यवाही महानगरपालिकेमार्फत करण्यात आली आहे. तसेच उक्त नियमातील तरतूदीनुसार आयुक्त, ठाणे महानगरपालिका यांनी महापालिका हद्दीत एकूण ४४ नागरी पुनर्निर्माण आराखडे तयार केले आहेत. सदर नागरी पुनर्निर्माण आराखडे ठाणे महानगरपालिकेमार्फत दि.२७/०४/२०१८ रोजीच्या जाहिर सूचनेन्वये प्रसिध्द केले असून नागरीकांच्या हरकती व सूचना मागविल्या आहेत. सदर जाहीर सूचनेमध्ये दिवा विभागाचे सुमारे २०१.७६ हेक्टर क्षेत्राचा समावेश करण्यात आला आहे. प्राप्त हरकती/ सूचनेवर सुनावणी घेऊन नागरी पुनर्निर्माण आराखडयाची हद्द अंतिम करण्याची कार्यवाही महानगरपालिकेचे स्तरावर सुरु आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## जामखेड (जि.वाशिम) गावाजवळ अकोला-नांदेड महामार्गावरील उड्डाणपुलाचे छत कोसळल्याबाबत

**(२६) १५७५७ (२०-११-२०२०). श्री.राजेंद्र पाटणी (कारंजा) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जामखेड (जि.वाशिम) गावाजवळ अकोला-नांदेड महामार्गावरील उड्डाणपुलाचे छत निकृष्ट बांधकामामुळे दिनांक २० ऑक्टोबर, २०२० रोजी वा त्या सुमारास पडले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या निष्कृष्ट बांधकामाची तक्रार या भागातील रहिवाशांनी व विविध पदाधिकारी यांनी संबंधित विभागाकडे केली, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर तक्रारीच्या अनुषंगाने विभागाने या निकृष्ट दर्जाच्या बांधकामाची चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळुन आले व तद्नुसार संबधित दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. अशोकराव चव्हाण (०७-१२-२०२०) :** (१) व (२) सदर काम केंद्र शासनाच्या भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरणाच्या अखत्यारितील आहे.

हे खरे नाही, असे प्रकल्प संचालक,भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरण,वाशिम यांनी कळविले आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**ठाणे जिल्ह्यातील पेढरघोळ (ता.शहापूर) येथील बॉटनिकल गार्डन नागरीकांसाठी खुले करण्याबाबत**

**(२७) १५८३२ (२०-११-२०२०). श्री.नितीन अर्जुन (ए.टी.) पवार (कळवण) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौ.पेढरघोळ (जि.ठाणे) येथील आदिवासी क्षेत्रामध्ये सन २०१९ मध्ये जैवविविधता उद्यान उभारणीसाठी ९० लाख रुपये खर्च करण्यात आले असून उद्यानाचे (बॉटनिकल गार्डन) बांधकाम दिनांक ३ सप्टेंबर, २०२० रोजी वा त्यासुमारास पूर्ण झाल्याचे निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर उद्यानात १२ राशींच्या पंचागाकृती नक्षत्र वनाची उभारणी करण्यात येऊन पंचागातील राशी, नक्षत्र व चरणांचा समावेश केल्यामुळे अभ्यासकांच्या व पर्यटनाच्याद‍ृष्टीने हे उदयान महत्वाचे ठरणारे आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर उद्यानाचे बांधकाम दीड वर्षापूर्वी पूर्ण होऊन सामाजिक वनिकरण विभागाकडून वन विभागास हस्तांतरीत न केल्यामुळे सदरहू उद्यान नागरिक, अभ्यासक व पर्यटकांसाठी अद्याप खुले करण्यात आले नसल्याची बाब दिनांक ३ सप्टेंबर, २०२० रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आली, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकणी शासनाने चौकशी करुन उद्यान पर्यटकांसाठी खुले करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. संजय राठोड (१०-१२-२०२०) :** (१) होय, मौजे पेंढरघोळ (जि. ठाणे) जवळ असलेले मौजे कानविंदे, (संरक्षित वन) ता.शहापूर, जि.ठाणे येथे सन २०१५-१६ ते २०१९-२० या कालावधीमध्ये जैवविविधता उद्यानाची निर्मिती करणेत आलेली आहे. सदर उद्यानातील कामांसाठी सन २०१८-१९ या कालावधीत रु.८९.८३ लाख खर्च करणेत आलेला असून सन २०१९-२० या कालावधीत ८.७७ लाख एवढा खर्च करणेत आलेला आहे. सदरचे काम मार्च २०२० मध्ये पूर्ण झाले आहे.

(२) होय, हे खरे आहे.

(३) व (४) या उद्यानातील कामे ही मार्च २०२० अखेर पूर्ण झाली आहेत. परंतू कोव्हीड-१९ विषाणुच्या प्रादुर्भावामुळे संपुर्ण देशभरात टाळेबंदी असल्यामुळे सदरहु उद्यान नागरिक, अभ्यासक व पर्यटकांसाठी खुले करण्यास शक्य झालेले नाही. टाळेबंदी संबंधात असलेले निर्बंध पूर्णत: शिथील केल्यानंतर उद्यान पर्यटकांसाठी खुले करण्याची कार्यवाही करण्यात येईल.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**वनपरिक्षेत्र अधिकारी (प्रादेशिक) (ता.हदगांव, जि.नांदेड) यांनी वृक्ष लागवडीत केलेला गैरव्यवहार**

**(२८) १५९८३ (२५-११-२०२०). श्री.माधवराव जवळगावकर पाटील (हदगाव) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वनपरिक्षेत्र अधिकारी (प्रादेशिक) (ता.हदगांव, जि.नांदेड) श्रीमती शरयु रुद्रावर,यांनी त्यांच्या कार्यकाळात ३३ कोटी वृक्ष लागवडी या उपक्रमांतर्गत मोठया प्रमाणात आर्थिक गैरव्यवहार केल्याची तक्रार सेवा ज्येष्ठ मजुरांनी दिनांक १९ ऑक्टोबर, २०२० रोजी वा त्यासुमारास उपवनसंरक्षक,नांदेड यांच्याकडे केली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, वन मजुरांना त्यांच्या श्रमाचा मोबदला प्रत्यक्षात कमी देऊन जास्त दिल्याचे दाखविल्याचे निदर्शनास आले हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी चौकशी करण्यात आली आहे काय, चौकशीत काय निष्पन्न झाले, चौकशीच्या अनुषंगाने संबधित दोषी श्रीमती शरयु रुद्रावार यांच्यावर कोणती कारवाई करण्यात आली वा येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची सर्वसाधारण कारणे काय आहेत ?

**श्री. संजय राठोड (१०-१२-२०२०) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) व (३) प्रथमदर्शनी सदर तक्रारीत तथ्य आढळून आले नाही. तथापि, सखोल चौकशीचे आदेश देण्यात आले आहेत. चौकशीअंती संबंधिताविरुध्द योग्य ती कार्यवाही करण्यात येईल.

(४) प्रश्नच उद्भवत नाही.

---

**भडगांव (जि.जळगाव) तालुक्यातील रस्त्यांच्या कामात निधीचा अपहार केल्याबाबत**

**(२९) १६५९७ (१४-११-२०२०). श्री.किशोर पाटील (पाचोरा) :** सन्माननीय **रोजगार हमी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जळगांव जिल्हयातील एकूण ५०० शेतपाणंद रस्त्यापैकी भडगांव (जि.जळगाव) तालुक्यातील ३३ रस्त्यांच्या कामाची कागदोपत्री दुरुस्ती झाल्याचे दाखवून भडगांवच्या तहसिलदार यांनी सरपंच, पोलिस पाटील, ग्रामसेवक,तंटामुक्ती समितीचे अध्यक्ष, शेतकरस्ता समन्वय समितीचे सदस्य, बीट जमादार, आणि तलाठी यांची सही न घेता परस्पर निधी फस्त केला असल्याचे माहे ऑक्टोबर,२०२० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय व चौकशीत काय आढळून आले,

(३) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने संबधित दोषी अधिका-यांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. संदीपानराव भुमरे (०८-१२-२०२०) :** (१) हे खरे नाही.
(२), (३) व (४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## नवी मुंबईतील खाजगी तसेच सिडकोनिर्मित मोडकळीस आलेल्या इमारतींचा पुनर्विकास करण्याबाबत

**(३०) १७२८७ (२१-११-२०२०). श्री.मंगलप्रभात लोढा (मलबार हिल) :** सन्माननीय **नगर विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नवी मुंबईतील खाजगी तसेच सिडकोनिर्मित मोडकळीस आलेल्या इमारतींचा पुनर्विकास करण्याकरीता ४ चटई क्षेत्र देण्याबाबत तसेच नवी मुंबईतील प्रकल्पग्रस्त ग्रामस्थांनी गरजेपोटी बांधलेली घरे नियमित करण्याची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधी (बेलापूर) यांनी शासनाकडे केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीनुसार नवी मुंबईतील इमारतींना ४ चटई क्षेत्र तसेच प्रकल्पग्रस्त ग्रामस्थांनी गरजेपोटी बांधलेली घरे नियमित करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (०८-१२-२०२०) :** (१) होय. हे खरे आहे.
मा.विधानसभा सदस्या सौ.मंदा म्हात्रे यांनी दि. १६/१०/२०२० रोजीचे निवेदनाद्वारे शासनास विनंती केली आहे.
(२) व (३) बृहन्मुंबई महानगरपालिका वगळता उर्वरित महाराष्ट्रातील सर्व महानगरपालिकांकरीता एकत्रिकृत विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियमावली शासनाने दि. २/१२/२०२० रोजीच्या अधिसूचनेद्वारे मंजूर केली आहे. तसेच सिडको व इतर नियोजन प्राधिकरणाकरीता सदरची विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियमावली लागू करण्यासाठी महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम, १९६६ चे कलम ३७(१कक)(क) अन्वये सूचना निर्गमित केली असून सदरची नियमावली तातडीने लागू करण्याकरीता शासनाने कलम १५४ अन्वये निदेश दिले आहेत.
सदर नियमावलीमध्ये सर्वसमावेशक तरतूदी अंतर्भूत करण्यात आल्या आहेत.

---

## देगलुर (जि.नांदेड) तालुक्यात ग्रामीण शौचालय योजनेत झालेला गैरव्यवहार

**(३१) १७४३७ (१९-११-२०२०). श्री.रावसाहेब अंतापूरकर (देगलूर) :** सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) देगलुर (जि.नांदेड) तालुक्यात दि.२ ऑक्टोबर, २०१४ रोजी पासून स्वच्छ भारत अभियान योजने अंतर्गत ग्रामीण शौचालय योजना राबविण्यात येत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर तालुक्यातील १०८ ग्रामीण भागात अर्धवट व काही ठिकाणी शौचालये दाखवून शौचालय न बांधताच पूर्ण रक्कम उचलून संगनमताने लाखो रुपयांचा गैरव्यवहार करण्यात आला आहे, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार या प्रकरणातील दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गुलाबराव पाटील (०४-१२-२०२०) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) हे, खरे नाही.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

### निम्न दुधना प्रकल्पातील कालवा व वितरिकेची कामे निकृष्ट दर्जाची झाल्याबाबत

**(३२) १७८८४ (२५-११-२०२०). श्री.बबनराव दत्तात्रय यादव (लोणीकर) (परतूर) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पंतप्रधान कृषी सिंचाई योजने अंतर्गत समाविष्ठ करण्यात आलेल्या निम्न दुधना प्रकल्पाच्या कालवा व वितरिकेची ४७२ कोटी ४० लक्ष रुपयांची कामे करण्यात आली असुन बहुतांश कामे निकृष्ट दर्जाची झाली असल्याचे शेतकऱ्यांनी निदर्शनास आणून दिले आहे,हे खरे आहे काय,
(२) असल्यास, निम्न दुधना प्रकल्पातील डाव्या आणि उजव्या कालव्याचे काम ठिकठिकाणी अर्धवट सोडून देण्यात आले असून या वर्षी अतिवृष्टीमुळे अनेक शेतकऱ्यांच्या शेतात या कालवा व वितरिकेच्या माध्यमातून वाहून जाणारे पाणी घुसले आहे,हे खरे आहे काय,
(३) असल्यास,केंद्र सरकारकडून चांगल्या प्रमाणात निधी उपलब्ध करून दिलेला असताना होणारी कामे मात्र निकृष्ट दर्जाची होत असुन परभणी जिल्ह्यात अनेक गाव परिसरात वितरिका उखडला गेल्या असल्याने या कामांबाबत मुख्य अभियंता, अधीक्षक अभियंता, कार्यकारी अभियंता, शाखा अभियंता यांच्यासह शाखाधिकारी जाणीवपूर्वक दुर्लक्ष करत आहेत,हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय व त्यानुसार संबंधित अधिकाऱ्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास,विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. जयंत पाटील (०३-१२-२०२०) :** (१) हे खरे नाही.
(२) हे खरे नाही.
(३) हे खरे नाही.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## मुंबई-पुणे राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ४ या महामार्गावरील मावळ (जि.पुणे) तालुक्यातील उड्डाणपुलाचे बांधकाम सुरू करणेबाबत

**(३३) १८०८१ (२१-११-२०२०). श्री.सुनिल शेळके (मावळ) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई-पुणे राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ४ या महामार्गावरील मावळ (जि.पुणे) तालुक्यातील एकूण नऊ उड्डाणपुल बांधण्याकरिता सन २०१७ साली मंजुरी मिळाली असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मंजुरी प्राप्त होऊन तीन वर्ष होऊन देखील सदरच्या उड्डाणपुलाचे बांधकाम सुरु झाले नसल्याचेही निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर उड्डाणपूलाच्या अभावी येथील महामार्गावर स्थानिकांना मोठ्या प्रमाणात वाहतूक कोंडीला सामोरे जावे लागत असून अपघाताला बळी पडून आपले प्राण गमवावे लागत असल्याचा घटना घडत आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, या प्रकरणी चौकशी करून संबंधित व जबाबदार अधिकारी यांच्यावर कारवाई करणेबाबत तसेच सदर उड्डाणपुलाचे बांधकाम पुर्ण करणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (०३-१२-२०२०) :** (१) हे खरे नाही.
(२) प्रश्न उद्‌भवत नाही.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही..
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## हिंगणघाट पंचायत समिती व समुद्रपूर पंचायत समिती या दोन्ही पंचायत समितीच्या नवीन इमारतीच्या प्रस्तावास मंजुरी मिळण्याबाबत

**(३४) १८१८० (२५-११-२०२०). श्री.समीर कुणावार (हिंगणघाट), श्री.विकास कुंभारे (नागपूर मध्य), श्री.बंटी भांगडिया (चिमूर) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) हिंगणघाट पंचायत समिती व समुद्रपूर पंचायत समिती या दोन्ही पंचायत समितीच्या इमारती फार जुन्या झाल्या असुन त्यांची दुरवस्था झाली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर दोन्ही पंचायत समितीच्या इमारतीची शासनाने पाहणी केली आहे काय,
(३) असल्यास, त्यानुसार नवीन इमारतींच्या प्रस्तावास तात्काळ मंजुरी देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. हसन मुश्रीफ (०२-१२-२०२०) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) व (३) हिंगणघाट पंचायत समितीच्या इमारतीची जागा पंचायत समितीच्या नावे करण्याची कार्यवाही चालू आहे तसेच पंचायत समिती, समुद्रपूर, जि.वर्धा येथील प्रशासकीय इमारत बांधकामाच्या प्रस्तावात त्रुटी असल्याने, सदर त्रुटींची जिल्हा परिषदेकडून पूर्तता झाल्यानंतर पंचायत समिती, समुद्रपुर, जि.वर्धा येथील नवीन प्रशासकीय इमारत बांधकामास निधीच्या उपलब्धतेनुसार प्रशासकीय मान्यता देण्यात येईल.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## नागरवाही, (ता. आरमोरी, जि.गडचिरोली) येथील रस्त्याचे डांबरीकरण करण्याबाबत

**(३५) १८५०५ (२५-११-२०२०). श्री.कृष्णा गजबे (आरमोरी) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नागरवाही (ता.आरमोरी, जि.गडचिरोली) येथील रस्त्याचे जिल्हा परिषद बांधकाम विभागाकडुन सन २०१७ मध्ये डांबरीकरण करण्यात आले होते, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर रस्त्याची देखभाल व दुरुस्ती अभावी दुरवस्था झाल्याने गावातील नागरीकांची गैरसोय होत असल्याची बाब माहे ऑक्टोबर, २०२० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, नागरवाही येथील नागरीकांना सदरहू रस्त्याचे डांबरीकरण करण्याची मागणी केलेली आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, ग्रामस्थांच्या मागणीनुसार रस्त्याचे डांबरीकरण करणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे काय,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. हसन मुश्रीफ (०२-१२-२०२०) :** (१) हे खरे नाही.
सदर रस्त्याच्या डांबरीकरणाचे काम प्रधानमंत्री ग्राम सडक योजनेंतर्गत सन २०१४ मध्ये पूर्ण झाले आहे.
(२) होय हे खरे आहे.
सदर रस्त्याचे काम पुर्ण होऊन सहा वर्षे झाली आहेत. देखभाल दुरुस्ती अभावी सदर रस्त्याची दुरावस्था झाली असल्याने गावकऱ्यांची गैरसोय होत आहे.
(३) हे खरे नाही.
रस्त्याचे डांबरीकरण करण्याची मागणी नागरवाही येथील नागरीकांनी केलेली नाही.

(४) ग्रामस्थांची अडचण विचारात घेऊन सदर रस्त्याचे फेरडांबरीकरणाचे काम विशेष देखभाल दुरुस्ती अंतर्गत सन २०२०-२१ मध्ये प्रस्तावित करण्यात आले आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**मोहदा (ता.केळापूर, जि.यवतमाळ) अंतरगाव लघु प्रकल्प डाव्या व उजव्या कालव्याचे मंजूर काम करण्याबाबत**

**(३६) १८५८१ (१४-११-२०२०). डॉ.अशोक उईके (राळेगाव) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मोहदा (ता.केळापूर, जि.यवतमाळ) अंतरगाव लघु प्रकल्प डावा व उजवा कालवा याची दुरूस्ती करण्याचे कामाला निधी देण्यात आला निविदा प्रक्रीया पुर्ण झाली असून सात ते आठ महिण्याचा कालावधी होउन सुध्दा सबंधीत विभागाच्या अधिकाऱ्याच्या दुर्लक्षामुळे कालवा दुरूस्तीचे काम करण्यात आले नसल्याचे दिनांक १० ऑक्टोबर, २०२० रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, अंतरगाव डाव्या व उजव्या कालव्यावर परिसरातील डोंगरखर्डा, पालोती, मेटीखेडा, किन्हाळा येथील शेतकरी यांच्या शेतजमीनी आहेत परिसरामध्ये पाउस जास्त झाला असल्याने शेतक-यांचे सोयाबीन व कापूस पिकाचे नुकसान झाले आहे. हे खरे आहे काय,
(३)असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय व त्यानुसार शेतक-यांना रब्बी पिका करिता कालव्याचे पाणी उपलब्ध करून देण्याकरिता कालवा दुरुस्त करण्यासह कालवा दुरुस्तीकडे दुर्लक्ष करणाऱ्या संबंधित विभागातील अधिकाऱ्यावर कारवाई करणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलबांची कारणे काय आहेत ?

**श्री. जयंत पाटील (०२-१२-२०२०) :** (१) अंतरगांव लघु प्रकल्प हा यवतमाळ जिल्हयातील कळंब तालुक्यातील असून या प्रकल्पाच्या डावा व उजवा कालवा विशेष दुरुस्ती कामाबाबत मार्च २०२० मध्ये कार्यारंभ आदेश कंत्राटदारास देण्यात आलेला आहे.

काम सुरु करण्याच्या कालावधी दरम्यान कोविड १९ चा प्रार्दुभाव झाल्यामुळे कंत्राटदारास काम सुरु करता आले नाही. परंतु आता सदर दुरुस्तीचे काम प्रगतीपथावर आहे.
(२) नाही.

महसूल विभागाकडून प्राप्त माहितीनुसार कळंब तालुक्यातील डोंगरखर्डा, पालोती, मेटीखेडा व किन्हाळा या परिसरात जास्त पाऊस झालेला नसल्यामुळे सोयाबीन व कापुस पिकाचे नुकसान झालेले नाही.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

तथापि अंतरगांव लघु प्रकल्पावर शेतक-यांना रब्बी पिकाकरीता मागणीनुसार पाणी देण्याबाबतची कार्यवाही करण्यात येत आहे. तसेच कालवा विशेष दुरुस्तीचे काम निधीच्या उपलब्धतेनुसार पूर्ण करण्याचे नियोजन आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**बोरखेडा खु. ते काळाडोह (ता.यावल, जि.जळगाव) या रस्त्याचे काम निकृष्ट दर्जाचे व अपूर्णावस्थेत असल्याबाबत**

**(३७) १८६२० (१४-११-२०२०). श्री.शिरीष चौधरी (रावेर) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जळगाव जिल्ह्यातील मुख्यमंत्री ग्राम सडक योजनेअंतर्गत मंजूर असलेल्या बोरखेडा खु. ते काळाडोह (ता.यावल) या रस्त्याचे काम निकृष्ट दर्जाचे सुरु असून सद्यस्थितीत ते अपूर्णावस्थेत असल्याचे माहे नोव्हेंबर, २०२० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर रस्त्याचे काम मागील २ वर्षापासून सुरु असताना अद्यापही अपूर्णावस्थेत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय व त्यानुसार रस्त्याचे काम तत्काळ पूर्ण करण्यासह निकृष्ट दर्जाचे काम करणा-या कंत्राटदारावर कारवाई करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. हसन मुश्रीफ (०२-१२-२०२०) :** (१) व (२) हे खरे नाही.

सदर कामाचा कार्यारंभ आदेश दि.०५.०३.२०१९ रोजी देण्यात आला असून सदर कामाची मुदत दि.०४.०३.२०२० पर्यंत होती. सदर काम दि. ०३.०३.२०२० रोजी पुर्ण झाले आहे.

(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**बामणोद ते वनोली (ता.यावल, जि.जळगाव) रस्त्याचे काम निकृष्ट दर्जाचे व अपूर्णावस्थेत असल्याबाबत**

**(३८) १८६२१ (२५-११-२०२०). श्री.शिरीष चौधरी (रावेर) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) यावल (जि.जळगाव) तालुक्यातील मुख्यमंत्री ग्राम सडक योजनेंतर्गत मंजूर असलेल्या बामणोद ते तालुका हद्द (बामणोद ते वनोली) या रस्त्याचे काम निकृष्ट दर्जाचे सुरु असून सद्यस्थितीत अपूर्णावस्थेत असल्याचे माहे नोव्हेंबर, २०२० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर रस्त्याचे काम मागील २ वर्षापासून सुरु असताना अद्यापही ते अपूर्णावस्थेत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय व त्यानुसार सदर रस्त्याचे काम निकृष्ट दर्जाचे करणा-या कंत्राटदारावर कारवाई करण्यासह रस्त्याचे काम तात्काळ पूर्ण करणेबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. हसन मुश्रीफ (०८-१२-२०२०) :**(१) व (२) हे खरे नाही.

सदर कामाचा कार्यारंभ आदेश दि.०५.०३.२०१९ रोजी देण्यात आला असून सदर कामाची मुदत दि.०४.०३.२०२० पर्यंत होती. सदर कामाच्या ३.३०० कि.मी. लांबीपैकी २०० मी. लांबीचे काम गावातील अतिक्रमण तसेच कोरोना प्रादुर्भाव असल्याने पुर्ण करता आले नाही. तद्नंतर अतिक्रमण काढल्याने सदर लांबीतील काम प्रगतीपथावर आहे.

सदर कामाची ३ SQM व १ SSQM यांनी योजनेच्या निकषानुसार तपासणी केली असून त्यांनी सदर कामास समाधानकारक शेरा दिला आहे.

(३) सदर काम निकृष्ट दर्जाचे झाले नसल्याने याबाबत चौकशी करण्याचा प्रश्न उद्‌भवत नाही. तथापि सदर काम माहे नोव्हेंबर २०२० अखेर पुर्ण करण्याबाबत संबंधित कंत्राटदारास सुचना देण्यात आल्या आहेत.

(४) सदर कामाच्या ३.३०० कि.मी. लांबीपैकी २०० मी. लांबीचे काम गावातील अतिक्रमण तसेच कोरोना प्रादुर्भाव असल्याने पुर्ण करण्यास विलंब झाला आहे.

---

## भोर व वेल्हे (जि.पुणे) तालुक्यातील गुंजवणी,कानंदी व नीरा नदीवरील उर्वरीत कोल्हापूरी पध्दतीच्या बंधा-यांची विशेष दुरुस्ती करण्याबाबत

**(३९) १८६२६ (२१-११-२०२०). श्री.संग्राम थोपटे (भोर) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भोर व वेल्हे (जि.पुणे) तालुक्यातील गुंजवणी,कानंदी व नीरा नदीवरील उर्वरीत कोल्हापूरी पध्दतीच्या बंधा-यांची विशेष दुरुस्ती कामासाठी प्रशासकीय मान्यता मिळण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधींनी मा.जलसंपदा व लाभक्षेत्र विकास मंत्री यांना दिनांक २२ सप्टेंबर,२०२० रोजी वा त्यासुमारास निवेदन दिले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास,निवेदनाच्या अनुषंगाने सदर कोल्हापूरी पध्दतीच्या बंधा-यांची विशेष दुरुस्ती कामासाठी प्रशासकीय मान्यता मिळण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास,विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. जयंत पाटील (०८-१२-२०२०) :** (१) होय.

महामंडळस्तरावर सदर निवेदन प्राप्त आहे.

(२) पुणे जिल्ह्यातील भोर व वेल्हे तालुक्यातील गुंजवणी, कानंदी व नीरा नदीवरील एकूण २३ कोल्हापूरी पध्दतीच्या बंधाऱ्यांपैकी १२ बंधाऱ्यांची दुरूस्तीस महामंडळाने बिगर सिंचन प्रापणसूचीद्वारे मान्यता दिलेली असून उर्वरित ११ को.प.बंधाऱ्यांच्या दुरूस्ती कामांची अंदाजपत्रके तयार करण्याची कार्यवाही क्षेत्रिय स्तरावर प्रगतीपथावर आहे. अंदाजपत्रकांना सक्षम स्तरावर मान्यता घेऊन काम हाती घेण्याचे नियोजित आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही

---

## गुंजवणी चापेट प्रकल्प (ता.वेल्हे, जि.पुणे) वाजेघर खोरे व वांगणी खोरे ह्या नविन स्वतंत्र उपसा सिंचन योजनांबाबत

**(४०) १८७२५ (२१-११-२०२०). श्री.संग्राम थोपटे (भोर) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) गुंजवणी चापेट प्रकल्प (ता.वेल्हे, जि.पुणे) वाजेघर खोरे व वांगणी खोरे ह्या नविन स्वतंत्र उपसा सिंचन योजनांच्या अंदाजपत्रकीय रक्कमेस मान्यता देण्याबाबत लोकप्रतिनिधींनी मा.जलसंपदा मंत्री यांना दिनांक २२ सप्टेंबर, २०२० रोजी वा त्यासुमारास लेखी निवेदन दिले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, निवेदनाच्या अनुषंगाने सदर उपसा सिंचन योजनांच्या अंदाजपत्रकीय रक्कमेस मान्यता देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. जयंत पाटील (०८-१२-२०२०) :** (१) होय.

(२) गुंजवणी चापेट प्रकल्प (ता.वेल्हे, जि.पुणे) वाजेघर खोरे व वांगणी खोरे या नविन स्वतंत्र उपसा सिंचन योजनेचा समावेश करण्याबाबत महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळ, पुणे यांनी दि.३१/०५/२०१८ रोजी प्रस्ताव सादर केला होता. सदर प्रस्तावाच्या अनुषंगाने गुंजवणी प्रकल्पातील प्रस्तावित ३ स्वतंत्र उपसा सिंचन योजनेकरीता (वाजेघर, वांगणी व शिवगंगा उपसा सिंचन योजना) आवश्यकतेनुसार अतिरिक्त पाणीसाठा उपलब्ध होत नसल्याने सदरहू उपसा सिंचन योजनांना मान्यता देणे शक्य होणार नाही असे कार्यकारी संचालक, महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळ, पुणे यांना दि.०३/१२/२०१८ च्या पत्रान्वये कळविले आहे.

तद्नंतर दि.१९/०८/२०२० रोजी झालेल्या बैठकीत सदर उपसा सिंचन योजनेकरीता धरणाच्या उर्ध्व बाजूस राखीव असणाऱ्या पाण्याच्या कोट्यातून राज्य जलनितीनुसार पाणी वापराच्या प्राधान्यक्रमानुसार खातरजमा करुन किती पाणी देता येणे शक्य आहे, याचा अभ्यास करावा असे निर्देश दिले आहेत. त्याअनुषंगाने महामंडळाने दि.०५/११/२०२० प्रस्ताव सादर केला असून, त्यावर कार्यवाही सुरु आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## शेगाव ते पंढरपूर (जि.बुलढाणा) या पालखी मार्गावरील हॅम अंतर्गत रस्त्याचे बांधकाम अपूर्णावस्थेत असल्याबाबत

**(४१) १८७८१ (२६-११-२०२०). श्री.रणधीर सावरकर (अकोला पूर्व) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बुलढाणा जिल्ह्यातील शेगाव ते पंढरपूर या पालखी मार्गावरील रस्त्याचे बांधकाम एच.ए.एम (हॅम) अंतर्गत करण्यात येत असून कामाचा कार्यारंभ करण्याचा आदेश दिनांक ५ फेब्रुवारी, २०१९ रोजी वा त्यासुमारास कंत्राटदारास देण्यात आला असून उक्त काम पूर्ण करण्याचा कालावधी दिनांक ४ फेब्रुवारी, २०२१ रोजीपर्यंत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर कामाच्या पूर्णत्वाचा कालावधी दिनांक ४ फेब्रुवारी, २०२१ असतांना माहे ऑक्टोबर, २०२० अखेर पर्यंत ५५ कि.मी. रस्त्यापैकी फक्त रस्ता सबग्रेडचेच काम करण्यात आले असुन संपुर्ण कामापैकी केवळ सुमारे ३० टक्केच काम करण्यात आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर रस्त्याचे काम प्रलंबित असुन रस्त्याचे पूर्ण खोदकाम करून ठेवले असल्यामुळे वाहतुकीस अडचणी निर्माण होत आहेत, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, सदर रस्त्याचे काम कंत्राटदाराकडून नियोजित वेळेत व गुणवत्तापूर्वक करून घेण्याबाबत अधिक्षक अभियंता सार्वजनिक बांधकाम विभाग, अकोला यांचेमार्फत कंत्राटदारावर कोणतीही कारवाई करण्यात आलेली नाही, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, याबाबत चौकशी करून सदर काम कालमर्यादेत पूर्ण करण्याकरिता शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. अशोकराव चव्हाण (०१-१२-२०२०) :** (१) होय.
(२) होय, हे अंशत: खरे आहे.

६५.०० कि.मी. लांबी रुंदीकरणासाठी सबग्रेडचे काम पूर्ण, GSB २५.०० किमी पूर्ण, WMM१५.०० किमी पूर्ण, २ लहान पुल प्रगतीत, ४० मोऱ्यांचे बांधकाम प्रगतीत, ७७ किमी कच्ची गटारे पूर्ण,

संपूर्ण कामापैकी अंदाजे ३०% काम पूर्ण झाले आहे.

(३) नाही.

वाहतुकीस अडथळा निर्माण होऊ नये म्हणून सुरक्षिततेसाठी जागोजागी रेडीयम पट्टी, सेफ्टी बॅरीगेट,गनिबॅग इत्यादी उपाययोजना करण्यात आले आहे.

(४) नाही.

दिनांक १२/३/२०२० नुसार करारनाम्यातील अट क्र.१२.३.१ नुसार Performance security ५% म्हणजेच रुपये १८,५५,००,०००/-) च्या ०.१% प्रतिदिन दराप्रमाणे दंडात्मक नुकसान भरपाई आकारण्यात आली. त्यानुसार दि.११/०२/२०२० पर्यंत रुपये १,८५,५००/- प्रमाणे एकूण रुपये १,८५,५०,०००/- ची नुकसान भरपाई आकारण्यात आली आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.
(६) प्रश्न उद्भवत नाही.

---

**फुडलॅन्ड कळंबोली (ता.पनवेल, जि.रायगड) ते मुंबई-पुणे राज्य महामार्ग ४ या दरम्यान नवीन पुल बांधण्याबाबत**

**(४२) १८८२७ (२१-११-२०२०). श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.समीर कुणावार (हिंगणघाट), श्री.महेश बालदी (उरण), श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) फुडलॅन्ड कळंबोली (ता.पनवेल, जि.रायगड) ते मुंबई-पुणे राज्य महामार्ग ४ या दरम्यान नवीन पुल बांधण्याची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी माहे ऑक्टोबर, २०२० मध्ये वा त्यादरम्यान मा.सार्वजनिक बांधकाम मंत्री (सार्वजनिक उपक्रम) यांच्याकडे निवेदनाद्वारे केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर महामार्गावरील कळंबोली व रोडपाली वसाहती, रामकृष्ण फुडलॅन्ड ते स्टिल मार्केट या जंक्शनजवळ वाढत्या रहदारीमुळे वाहतुकीची प्रचंड कोंडी होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त विभागात नवीन पुल उभारल्यास पनवेल, जेएनपीटी, पुणे, कोकणातून ठाणे, कल्याण तसेच नाशिककडे जाणा-या वाहनांना कळंबोली व परिसरातील वाहतुक कोंडीचा सामना करावा लागणार नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करून फुडलॅन्ड कळंबोली (ता.पनवेल, जि.रायगड) ते मुंबई-पुणे राज्य महामार्ग ४ या दरम्यान नवीन पुल बांधण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (०९-१२-२०२०) :** (१) हे खरे नाही.

(२) गर्दीच्या वेळी वाहतुकीची कोंडी होते, हे खरे आहे.

(३) होय, खरे आहे.

(४) नवीन पूल बांधण्याबाबत मागणी प्राप्त झाल्यास त्यानुसार सविस्तर प्रस्ताव सडक परिवहन मंत्रालय भारत सरकार (MORTH) यांचे मंजुरीसाठी पाठवण्यात येईल.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**गडमठ (ता.वैभववाडी, जि.सिंधुदुर्ग) व कासार्डे (ता.कणकवली, जि.सिंधुदुर्ग) या दोन गावांना जोडणाऱ्या झीरंग नदीवरील पूलाच्या बांधकामाबाबत**

**(४३) १८८६७ (२१-११-२०२०). अॅड.आकाश फुंडकर (खामगांव) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) गडमठ (ता.वैभववाडी, जि.सिंधुदुर्ग) व कासार्डे (ता.कणकवली, जि.सिंधुदुर्ग) या दोन गावांना जोडणाऱ्या झीरंग नदीवरील पूलाच्या बांधकामास नाबार्ड मधून सुमारे २ कोटी १० लाख रुपयांचा निधी प्राप्त झाला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू पूलाच्या बांधकामास नाबार्ड मधून निधी मंजूर झालेला असतांनाही अद्यापपर्यंत पूलाच्या बांधकामास प्रत्यक्षात सुरुवात झालेली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, अद्याप सदरहू पूलाचे बांधकामास प्रत्यक्षात सुरुवात न होण्याची सर्वसाधारण कारणे काय आहेत,

(४) असल्यास, सदरहू पूलाचे बांधकाम विनाविलंब हाती घेऊन बांधकाम पुर्ण करून वाहतूकीस कार्यान्वित होण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. अशोकराव चव्हाण (०७-१२-२०२०) :** (१), (२), (३) व (४) प्रश्नांकित पूलाच्या कामास रु.२६९.०६ लक्ष किमंतीला प्रशासकीय मान्यता प्राप्त झाली आहे.

पूलाच्या प्रत्यक्ष साईटवरील चाचणी रंध्रे घेणेची कार्यवाही पूर्ण झाली असून तांत्रिक मान्यता, निविदाबाबतची कार्यवाही करुन काम हाती घेण्याचे नियोजन आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**विमानतळासाठी निधी वाटप करताना विदर्भावर अन्याय होत असल्याबाबत**

**(४४) १८८७८ (२६-११-२०२०). श्री.देवेंद्र फडणवीस (नागपूर दक्षिण पश्चिम), श्री.चंद्रकांत (दादा) पाटील (कोथरुड), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्री.सुभाष देशमुख (सोलापूर दक्षिण), श्री.राम कदम (घाटकोपर पश्चिम), श्री.अभिमन्यु पवार (औसा), श्री.सुधीर मुनगंटीवार (बल्लारपूर), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.गोवर्धन मांगीलाल शर्मा (ऊर्फ) लालाजी (अकोला पश्चिम) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील विकास निधी कोरोनावरील उपाययोजनांमध्ये वापरण्यात आल्याचे कारण सांगत शासनाने विदर्भातील विमानतळांचे काम थांबविले असल्याचे माहे ऑक्टोबर, २०२० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अमरावती विमानतळासाठी ७३ कोटी रुपयांचा निधी मंजूर होऊन २१ कोटी रुपयांचे काम शिल्लक असताना कोरोना महामारीचे कारण सांगून निधी रोखण्यात आला आहे, तसेच नागपूर येथील डॉ.बाबासाहेब आंबेडकर आंतरराष्ट्रीय विमानतळ, चंद्रपूर जिल्ह्यातील राजूरा जवळ उभारण्यात येत असलेले विमानतळ, अमरावती विमानतळ आदी इतर विमानतळांना देण्यात आलेला निधी न मिळाल्याने कामे प्रलंबित आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) तसेच, सोलापूर जिल्ह्यातील बोरमणी विमानतळासाठी अतिरिक्त ३४ हेक्टर जमीन अधिग्रहणासाठी माहे सप्टेंबर, २०२० मध्ये वा त्यादरम्यान शासनाने ५० कोटी रुपये मंजूर केले आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, राज्यातील सर्व विमानतळाच्या बाबतीत अशी परिस्थिती असताना पश्चिम महाराष्ट्रातील विमानतळांना कोरोना काळात निधी दिल्याने शासनाकडून दुजाभाव होत असल्याने सर्वत्र संताप व्यक्त होत असताना कोरोना काळात थांबविण्यात आलेल्या सर्व विकास कामांचा निधी आणि वेतनामध्ये लावलेली कपात केव्हापर्यंत उठविण्यात येणार आहे,

(५) असल्यास, अमरावती, चंद्रपूर, नागपूर या विदर्भातील विमानतळांच्या निर्मिती व विकासकामे करण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. उद्धव ठाकरे (०१-१२-२०२०) :** (१) हे खरे नाही.

(२) हे खरे नाही.

(३) सोलापूर जिल्ह्यातील बोरामणी विमानतळासाठी अतिरिक्त ३४ हेक्टर जमीनीच्या संपादनासाठी शासनाने रु. ४०.०० कोटी निधीस मंजूरी दिली आहे.

(४) निधीच्या उपलब्धतेनुसार विमानतळासाठी निधी वाटप करण्याची कार्यवाही करण्यात येत आहे.

(५) अमरावती, चंद्रपूर, नागपूर या विदर्भातील विमानतळांच्या निर्मिती व विकास काम करण्यासाठी शासनाने पुढीलप्रमाणे कार्यवाही केली /करण्यात आली आहे:-

अमरावती येथील विमानतळ-धावपट्टी विस्तारीकरण व संबंधीत कामे प्रगतिपथावर आहेत व विमानतळ इमारतीसाठी निविदा प्रक्रीया सुरु आहे. कंपाउड वॉल चे काम ९०% पूर्ण झाले आहे.

चंद्रपूर येथील विमानतळ-जमिन संपादन सुमारे ८२% पूर्ण, शासकीय जमिन ताब्यात, वन जमिनीबाबत कार्यवाही सुरु आहे.वन जमिनी बदल्यात द्यावयाच्या पर्यायी खाजगी जमिनीच्या खरेदीची प्रक्रीया खाजगी वाटाघाटी पद्धतीने सुरु आहे. तसेच काही प्रकरणे न्यायालयात सुरु असल्यामुळे जमिनीच्या संपादनाच्या कामाला विलंब होत आहे.

नागपूर येथील विमानतळ-विमानतळाच्या खासगीकरणा करीता नव्याने निविदा प्रक्रीया सुरु करण्यात येत आहे.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

---

## दौंड (जि.पुणे) उपजिल्हा रुग्णालयाचे बांधकाम सुरु करण्याबाबत

**(४५) १८९०९ (२१-११-२०२०). श्री.राहूल कुल (दौंड) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) दौंड (जि.पुणे) उपजिल्हा रुग्णालयाचे ५० खाटावरून १०० खाटामध्ये श्रेणीवर्धन करण्यासाठी शासनाने मान्यता दिली असून, त्यासाठी सुमारे ३३.५० कोटी रुपये निधीला मान्यता दिली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्य शासनाच्या सन २०२० -२०२१ च्या अर्थसंकल्पात पहिल्या टप्प्याचा निधी उपलब्ध झाला असून वाढीव इमारतीचे बांधकाम अद्याप सुरु झालेले नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास उक्त रुग्णालयाचे बांधकाम सुरु करण्याबाबत शासन स्तरावर कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. अशोकराव चव्हाण (०७-१२-२०२०) :** (१) हे खरे आहे.

(२) व (३) हे खरे आहे. मार्च २०२० अर्थसंकल्पात काम समाविष्ठ असून रु.३३५.२२ लक्ष तरतूद करण्यात आली आहे. सदर कामाचे सविस्तर अंदाजपत्रक तयार करणेचे काम प्रगतीत असून तांत्रिक मान्यता तातडीने प्राप्त करुन निविदा प्रक्रिया सुरु करण्याचे नियोजन आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## चंद्रपूर जिल्ह्यातील बामणी ते नवेगाव एन.एच. ३५३ बी ईपीसी अंतर्गत सुरु असलेल्या रस्त्याच्या कामाच्या चौकशीबाबत

**(४६) १९०३७ (२१-११-२०२०). श्री.सुभाष धोटे (राजूरा) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चंद्रपूर जिल्ह्यातील बामणी ते नवेगाव एन.एच. ३५३ बी ईपीसी अंतर्गत या रस्त्याचे काम सुरु असुन सदर काम अंदाजपत्रकीय तरतुदीनुसार करण्यात येत नसल्याने सदर कामाच्या चौकशीबाबत सचिव, रस्ते सार्वजनिक बांधकाम व मुख्य अभियंता राष्ट्रीय महामार्ग यांना लोकप्रतीनिधी यांनी दिनांक १७ ऑगस्ट, २०२० रोजी वा त्यासुमारास निवेदन दिले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त निवेदनाच्या अनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. अशोकराव चव्हाण (०७-१२-२०२०) :** (१) हे खरे आहे.

(२) निवेदनात उपस्थित केलेल्या मुद्यांच्या अनुषंगाने Authority Engineer व्दारा कामाची प्रत्यक्ष तपासणी करण्यात आली असून sub grade, GSB, DLC व सिमेंट नालीचे झाकण यांची जाडी मानकानुसार /अंदाजपत्रकीय तरतुदीनुसार असल्याचे आढळून आले आहे. तथापी रस्त्याच्या ज्या ठिकाणी भेगा पडल्याचे आढळून आले, त्या ठिकाणचे काँक्रिट पॅनेल पूर्णपणे काढून कंत्राटदारामार्फत मानकाप्रमाणे पुन:श्च काम करुन घेण्यात आले आहे व कामाची माहिती देणारा फलक कामाचे ठिकाणी कि.मी.२८४/४०० नवेगाव येथे लावण्यात आला असून कामामध्ये मानकानुसार योग्य गुणवत्तेच्या मुरुमाचा वापर करण्यात आला आहे.

सदर कामाची गुणवत्ता तपासणी व दैनंदिन देखरेख नियुक्त स्वतंत्र अभियंता यांचेमार्फत करण्यात येत असून त्यानुसार आवश्यक दुरुस्ती करण्यात येत आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## साकोली-लाखांदुर-वडसा-गडचिरोली या नवनिर्मित राष्ट्रीय महामार्गाचे काम संथगतीने सुरु असल्याबाबत

**(४७) १९१५९ (२१-११-२०२०). श्री.कृष्णा गजबे (आरमोरी) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) साकोली-लाखांदुर-वडसा-गडचिरोली-चामोर्शी-आष्टी-आलापल्ली ते सिरोंचा या नवनिर्मित राष्ट्रीय महामार्गाचे दिनांक ११ मार्च, २०१६ रोजी वा त्या सुमारास भुमिपुजन करण्यात आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त राष्ट्रीय महामार्गातील साकोली-लाखांदुर-वडसा-गडचिरोली या मार्गाचे काम मागील ३ वर्षापासुन संथगतीने सुरु असल्याचे माहे ऑक्टोबर, २०२० मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर मार्गावरील देसाईगंज (वडसा) येथे शहराबाहेरुन सावंगी-अर्जुनी (मोर) रस्ता-तुकुम-नैनपुर मार्गे वडसा-आरमोरी मुख्य रस्त्यापर्यंत बायपास रोड तयार करण्याची मागणी नागरीक करित आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत चौकशी करून सदर मागणीच्या अनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. अशोकराव चव्हाण (०७-१२-२०२०) :** (१) साकोली ते सिरोंचा हा रस्ता राष्ट्रीय महामार्ग ३५३-सी म्हणून सन २०१४ ला घोषीत करण्यात आला. या रस्त्याच्या उन्नतीकरणाचे काम टप्प्या टप्प्याने नियोजीत असून यापैकी साकोली ते भंडारा जिल्हा सिमा या ५५.८० कि.मी. लांबीच्या कामाच्या बांधकामाची उद्घोषणा मार्च २०१६ मध्ये घेण्यात आलेल्या इतर कामांच्या भूमीपूजन कार्यक्रमा दरम्यान करण्यात आली असून सदर कामास सन २०१७ मध्ये सुरूवात करण्यात आली आहे.

(२) अंशत: खरे आहे.

साकोली ते भंडारा जिल्हा सिमा च्या कामाची गती वन जमिनीमुळे आलेल्या अडथळयांमुळे सुरुवातीला संथ होती, यावर रस्ते परिवहन महामार्ग मंत्रालय, नवी दिल्ली मार्फत वनभागातील लांबीमधे डांबरीकरणाचा निर्णय घेण्यात आला असून उर्वरीत लांबीत क्राँक्रीट रस्ता बांधण्यात येणार आहे. सद्य:स्थितीत या कामाची ४२% प्रगती झाली असून माहे जून-२०२१ पर्यंत काम पूर्ण करण्याचे नियोजित आहे. तसेच भंडारा जिल्हा सिमा ते वडसा गडचिरोली या लांबीतील उन्नतीकरणाची कामे वाहतुकीच्या घनतेच्या प्राधान्यानुसार टप्प्याटप्प्याने घेण्याचे नियोजित असून सदयस्थितीत या लांबीतील कामांना मंजुरी प्राप्त होणे बाकी आहे.

(३) व (४) देसाईगंज (वडसा) शहराबाहेरुन बायपास करण्याचे नियोजित आहे, त्या अनुषंगाने कामाच्या प्रकल्प अहवालाच्या सल्लागारामार्फत प्राथमिक अभ्यास करण्यात आला आहे. त्यानुसार सदर वळणमार्ग शहराच्या पश्चिम भागातून प्रस्तावित आहे. सद्यस्थितीत या वळणमार्गाचे कामास मंजुरी देण्यात आली नसल्याने याचा सविस्तर अहवाल बनविण्यात आलेला नाही. सदर वळणमार्गाच्या बांधकामाचे काम वार्षिक नियोजन आराखडयात समाविष्ट होताच सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करण्यात येऊन भूसंपादनाची प्रक्रिया सुरु करण्यात येईल. तथापि प्रश्नात नमूद केल्यानुसार सावंगी-अर्जुनी (मोर) रस्ता तुकुम नैनपूर मार्गे वडसाळ-आरमोरी मुख्य रस्त्यापर्यंत बायपास बांधकाम करणे अशी मागणी प्राप्त झालेली नाही. (सदर मागणी ही वडसा शहराच्या पूर्व भागातून बायपास बांधकामाची आहे.)

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

### रत्नागिरी जिल्ह्यातील साखरपा (कोंडगाव) जोयशीवाडी धरणाच्या दुरुस्तीबाबत

**(४८) १९२५५ (२१-११-२०२०). श्री.राजन साळवी (राजापूर) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) रत्नागिरी जिल्ह्यातील साखरपा (कोंडगाव) जोयशीवाडी धरण धोकादायक अवस्थेत असून धरणाला अनेक ठिकाणी तडे गेल्याने त्यातून गळती सुरू असल्याचे माहे ऑगस्ट, २०२० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास,सदर धरण धोकादायक अवस्थेत असल्याचा अहवाल तयार करून सुमारे दोन कोटी रूपयांचा दुरूस्तीचा प्रस्ताव सादर केला असून तो अद्यापपर्यंत प्रलंबित आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास,याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय व त्यानुसार सदर दुरस्तीच्या प्रस्तावास तात्काळ मंजूरी देवून धरणाची दुरुस्ती करणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. जयंत पाटील (०८-१२-२०२०) :** (१) अंशत: खरे आहे,

प्रथमत: २००७-०८ मध्ये पिचिंगमधून गळती असल्याबाबत निदर्शनास आले असून तेव्हापासून गळतीचे निरीक्षण सुरू आहे. सद्य:स्थितीत धरण धोकादायक अवस्थेत नाही.

(२) नाही.

(३) धरणामध्ये असलेल्या गळतीची दुरूस्ती करणेसाठी धरण सुरक्षितता संघटना, नाशिक यांचे सूचनेनुसार धरणाच्या आवश्यक दुरूस्तीचे अंदाजपत्रक तयार करण्याचे काम क्षेत्रिय स्तरावर प्रगतीत आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही

---

### लातूर जिल्ह्यातील औसा ते निलंगा या रस्त्याची सुधारणा करणेबाबत

**(४९) १९७८१ (२१-११-२०२०). श्री.अभिमन्यु पवार (औसा), श्री.राहूल कुल (दौंड) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) लातूर जिल्ह्यातील औसा ते निलंगा या रस्त्याची दूरवस्था झाल्यामुळे वाहतुक गैरसोयीची झाली असून या रस्त्यावर अपघाताचे प्रमाणही वाढले आहे हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरील रस्त्याची तातडीने सुधारणा करण्यात यावी तसेच सदर रस्ता राष्ट्रीय महामार्ग विभागाकडे हस्तांतरित करुन रस्त्याचे चौपदरीकरण करण्याबाबत तातडीने कार्यवाही करावी अशी मागणी औसा विधानसभा स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी दिनांक ९ ऑक्टोबर, २०२० रोजी वा त्यासुमारास दिशा समितीच्या लातूर जिल्हाधिकारी कार्यालयात झालेल्या आढावा बैठकीत कार्यकारी अभियंता सार्वजनिक बांधकाम विभाग निलंगा व कार्यकारी अभियंता राष्ट्रीय महामार्ग विभाग, लातूर यांच्याकडे केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर रस्त्याच्या सुधारणा करण्यासाठी किती निधीची आवश्यकता आहे,
(४) असल्यास, सदर रस्त्याच्या सुधारणा कामासाठी आवश्यक निधीची तरतूद करून रस्त्याची सुधारणा करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. अशोकराव चव्हाण (०८-१२-२०२०) :** (१) हे खरे नाही.
(२) होय. हे खरे आहे.

प्रश्नाधीन रस्त्यापैकी औसा ते लामजना चौक हा रस्ता यापूर्वीच राष्ट्रीय महामार्ग दर्जाचा असून लामजना चौक ते निलंगा रस्त्यांसंदर्भात सदरप्रमाणे मागणी करण्यात आली आहे.
(३) व (४) केंद्र शासनाने लामजना चौक ते निलंगा या रस्त्यास राष्ट्रीय महामार्ग म्हणून तत्वत: मंजूरी दिली असून या रस्त्याचे सविस्तर प्रकल्प अहवाल (DPR) तयार करण्याचे काम राष्ट्रीय महामार्ग विभाग, लातूर यांचेमार्फत प्रगतीत आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## दौंड तालुक्यातील (जि.पुणे) 'पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरण' अंतर्गत येणाऱ्या गावातील रस्त्यांच्या कामांना मंजुरी देऊन निधी मिळणेबाबत

**(५०) १९९०५ (२१-११-२०२०). श्री.राहूल कुल (दौंड), श्री.जयकुमार गोरे (माण), श्री.संग्राम थोपटे (भोर) :** सन्माननीय **नगर विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) दौंड तालुक्यातील (जि.पुणे) सुमारे ५१ गावांचा समावेश पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरण (PMRDA) मध्ये झाला असून या गावातील प्रमुख रस्त्यांची पावसामुळे दुरवस्था झाली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या गावांतील विविध रस्त्यांच्या कामांना सुमारे १० कोटी ३५ लक्ष रुपये निधी मिळवा अशी मागणी मा.लोकप्रतिनिधींनी दिनांक १४ ऑक्टोबर, २०२० रोजी वा त्यासुमारास निवेदनाद्वारे मा.उपमुख्यमंत्री यांचेकडे केली आहे, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्याअनुषंगाने गावातील रस्त्यांच्या कामांना निधी मिळणेबाबत शासनाकडून कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (०८-१२-२०२०) :** (१) दौंड तालुक्यातील ५१ गावे पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या कार्यक्षेत्रात समाविष्ट आहेत. या प्राधिकरणाकडे प्रादेशिक विकास आरखडा व नियोजित विकास आराखड्यातील रस्ते विकसित करणेची प्रमुख जबाबदारी असल्याने त्यादृष्टीने प्राधिकरणामार्फत नियोजन करण्यात येत आहे. प्राधिकरण क्षेत्रातील मुख्य राज्यमार्ग, राज्यमार्ग, प्रमुख जिल्हामार्ग हे रस्ते सार्वजनिक बांधकाम विभागाकडे तसेच इतर जिल्हा मार्ग, ग्रामीण मार्ग हे रस्ते जिल्हा परिषद यांचेकडे व योजनाबाह्य रस्ते हे ग्रामपंचायतीकडे नियमित देखभाल व दुरुस्तीसाठी असतात.

(२) होय, हे खरे आहे.
(३) व (४) प्राधिकरण क्षेत्रातील रस्ते कामांना मंजुरी देणेबाबत विविध लोकप्रतिनिधीकडून मागणी करण्यात येत आहे. तथापी, सन २०२०-२१ मध्ये कोविड १९ च्या पार्श्वभूमीवर प्राधिकरणास अत्यल्प उत्पन्न प्राप्त झाले असून मंजूर कामे/योजनांचे दायित्व मोठ्या प्रमाणात आहे. आर्थिक मर्यादांमुळे, काटकसरीच्या धोरणानुसार नविन रस्ते कामांना प्रशासकीय मान्यता देणे तुर्तास शक्य झालेले नाही. भविष्यात आवश्यक जमिनी व निधीच्या उपलब्धतेनुसार तसेच सदर रस्ते बांधल्याने क्षेत्र विकास होवून विकास परवानगीमुळे प्राधिकरणाच्या उत्पन्नात होणाऱ्या संभाव्य वाढीचा विचार करून आवश्यकतेनुसार रस्त्यांची कामे हाती घेण्याचे प्राधिकरणाच्या स्तरावर नियोजित आहे.

---

**विधान भवन :**
**मुंबई**

**राजेन्द्र भागवत**
**सचिव,**
**महाराष्ट्र विधानसभा.**

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.